भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# दंतवैद्य अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक १६)

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Dentists Act, 1948

## Act No. 16 of 1948

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

(१९८१)

[किंमत रु. २.१० पैसे]

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

२. 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, १९५०' (१९५० चा ५८).

३. 'मद्रास विधि अनुकूलन आदेश, १९५४'.

४. 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, १९५५' (१९५५ चा १२).

५. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६'.

६. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३६).

७. 'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद (पुनर्घटना व पुनर्रचना) आदेश, १९६१'.

८. 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ४२).

एच ४३१८-१

# दंतवैद्य अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

#### प्रास्ताविक


कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. निर्वचन.
२क. जम्मू व काश्मीरमध्ये अंमलात नसलेल्या कायद्यांच्या निर्देशांचा अर्थ लावणे.


### प्रकरण २ रे

#### भारतीय दंतवैद्यक परिषद


३. परिषदेची घटना व रचना.
४. परिषदेचे निगमन
५. निवडणुकांची पद्धती.
६. पदावधी व निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.
७. परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.
८. कर्मचारीवर्ग, पारिश्रमिक व भत्ते.
९. कार्यकारी समिती.
१०. दंतवैद्यकीय अर्हतांची मान्यता.
११. दंत आरोग्यरक्षकांच्या अर्हता.
१२. दंत कारागिरांच्या अर्हता.
१३. मान्यतेचा परिणाम.
१४. पाठ्यक्रम व प्रशिक्षण आणि परीक्षा यांबाबत माहिती मागवण्याची शक्ती.
१५. निरीक्षणे.
१५क. वीक्षकांची नियुक्ती.
१६. मान्यता काढून घेणे.
१६क. मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हतांची मान्यता काढून घेणे.
१७. घोषणांची पद्धती.
१७क. व्यावसायिक वर्तन.
१८. भारतीय नोंदवही.
१९. सादर करावयाची माहिती.
२०. विनियम करण्याची शक्ती.


### प्रकरण ३ रे

#### राज्य दंतवैद्यक परिषद


२१. राज्य परिषदांची घटना व रचना.
२१क. मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद आणि महाराष्ट्र व गुजरात राज्यांच्या राज्य परिषदांची घटना यांच्या संबंधात तात्पुरता उपबंध.
२२. आंतरराज्यीय करार.
२३. संयुक्त राज्य परिषदांची रचना.
२४. राज्य परिषदांचे निगमन.
२५. राज्य परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.
२६. निवडणुकांची पद्धती.
२७. पदावधी व निमित्तवशात रिक्त होणाऱ्या जागा.
२८. कर्मचारीवर्ग, पारिश्रमिक व भत्ते.
२९. कार्यकारी समिती.
३०. माहिती सादर करणे.

## प्रकरण ४ थे

### नोंदणी

कलमे

३१. नोंदवही तयार करणे व राखणे.
३२. नोंदवही प्रथमतः तयार करणे.
३३. नोंदवही प्रथमतः तयार केल्यानंतर नोंद केली जाण्यासाठी अर्हता.
३३क. महाराष्ट्र राज्य आणि गुजरात राज्य यांच्या दंतवैद्य नोंदवह्यांच्या संबंधात उपबंध.
३४. नंतरच्या नोंदणीसाठी अर्हता.
३५. नोंदणीकरता आलेल्या अर्जांची छाननी.
३५क. दंतवैद्य नोंदवही विशोधित करण्यासाठी विशेष उपबंध.
३६. दंत आरोग्यरक्षक व दंत कारागीर यांच्या नोंदवह्या.
३७. दंत आरोग्यरक्षक म्हणून नोंदणी होण्यासाठी अर्हता.
३८. दंत कारागीर म्हणून नोंदणी होण्यासाठी अर्हता.
३९. नवीकरण फी.
४०. अतिरिक्त अर्हतांची नोंद करणे.
४१. नोंदवहीतून नाव काढून टाकणे.
४२. नोंदवहीत नाव पूर्ववत दाखल करणे.
४३. अधिकारितेला आडकाठी.
४४. प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.
४५. नोंदवह्या छापणे.
४६. नोंदणीचा परिणाम.
४६क. नोंदणी वर्ग करणे.

## प्रकरण ५ वे

### संकीर्ण

४७. नोंदणी झाली असल्याचा खोटा दावा करण्याबद्दल दंड.
४८. उपाधींचा गैरवापर.
४९. नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी व्यवसाय करणे.
५०. नोंदणी प्रमाणपत्र परत करण्यास चुकणे.
५१. कंपन्यांनी दंतवैद्यक व्यवसाय न करणे.
५२. अपराधांची दखल घेणे.
५३. फीचा काही अंश परिषदेस देणे.
५३क. हिशेब व लेखापरीक्षा.
५४. चौकशी आयोगाची नियुक्ती.
५५. नियम करण्याची शक्ती.
अनुसूची.

# दंतवैद्य अधिनियम, १९४८

[1](१९४८ चा अधिनियम क्रमांक १६)

[ २९ मार्च, १९४८ ]

दंतवैद्यकीच्या पेशाचे विनियमन करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, दंतवैद्यकीच्या पेशाचे विनियमन करण्यासाठी उपबंध करणे व त्या प्रयोजनार्थ दंतवैद्यक परिषदा घटित करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रकरण १ ले

### प्रास्ताविक

१. (१) या अधिनियमास 'दंतवैद्य अधिनियम, १९४८' असे म्हणता येईल. — संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार [2][[3]* * * * संपूर्ण भारतभर] आहे.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— — निर्वचन.

(क) "दंतवैद्यक परिषद" याचा अर्थ, कलम ३ खाली घटित केलेली "भारतीय दंतवैद्यक परिषद" असा आहे;

(ख) "दंत आरोग्यरक्षक" याचा अर्थ, दंतवैद्य किंवा वैद्यक व्यवसायी नसलेली जी व्यक्ती दातांवरील किटण काढते, दात स्वच्छ करते किंवा दातांना पॉलिश करते अथवा दातांच्या आरोग्याबाबत सूचना देते ती व्यक्ती असा आहे ;

(ग) "दंत कारागीर" याचा अर्थ, जी व्यक्ती दातांच्या कवळ्या व दंतचिकित्सेची उपयंत्रे तयार करते अथवा दुरुस्त करते ती व्यक्ती असा आहे;

(घ) "दंतवैद्यक/दंतवैद्यकी" यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) मानवी दात किंवा जबडा यांवर कोणतीही शस्त्रक्रिया करणे व त्यासंबंधीचा कोणताही रोग, न्यूनता किंवा विकृती यांवर उपचार करणे, आणि मानवी दात किंवा जबडा किंवा तोंडाची पोकळी यांच्या संबंधात क्ष-किरणचित्रणाचे काम करणे ;

(दोन) अशी कोणतीही शस्त्रक्रिया किंवा उपचार यांच्या संबंधात बधिरकारकाचा प्रयोग करणे ;

(तीन) कृत्रिम कवळ्या किंवा दातांची सुस्थितिकारक उपसाधने यांची यांत्रिक घडण करणे किंवा त्यांचे नवीकरण करणे ;

(चार) कृत्रिम कवळ्या किंवा दातांची सुस्थितिकारक उपसाधने बसवणे, घालणे, पक्की बसवणे, बनवणे, दुरुस्त करणे किंवा त्यांचे नवीकरण करणे याची पूर्वतयारी म्हणून, किंवा त्या प्रयोजनासाठी किंवा त्यासंबंधात एखाद्या व्यक्तीवर कोणतीही शस्त्रक्रिया करणं अथवा तिच्यावर उपचार करणे, तिला सल्ला देणे किंवा तिच्यावर देखरेख ठेवणे, आणि बहुधा दंतवैद्य करतात त्याप्रमाणे अशी कोणतीही शस्त्रक्रिया करणे व त्याप्रमाणे असा कोणताही उपचार करणे, सल्ला देणे किंवा देखरेख ठेवणे ;

(ङ) "दंतवैद्य" याचा अर्थ, जी दंतवैद्यक व्यवसाय करते ती व्यक्ती असा आहे ;

(च) "वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, 'भारतीय वैद्यक पदवी अधिनियम, १९१६' (१९१६ चा ७)-कलम ३ खाली विनिर्दिष्ट केलेल्या किंवा अधिसूचित केलेल्या अथवा [4]['भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०२)] याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या [5][अथवा कोणत्याही राज्यात त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या] प्राधिकरणाने प्रदान केलेली अर्हता धारण करत असेल अथवा जी व्यक्ती

---

१. हा अधिनियम पुढील ठिकाणी त्या त्या विनियमाद्वारे लागू करण्यात आला आहे :—
दादरा व नगर हवेली—१९६३ चा विनियम ६;
पाँडिचेरी—१९६३ चा विनियम ७; आणि
गोवा, दमण, आणि दीव—१९६३ चा विनियम ११.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारताचे सर्व प्रांत" याऐवजी घातले.

३. १९७२ चा अधिनियम ४२–कलम २ द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून" हे शब्द गाळले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ३ द्वारे "'भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९३३' (१९३३ चा २७)" या शब्दांऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

५. १९५५ चा अधिनियम १२–कलम ३ द्वारे घातले.

एखाद्या वैद्यकप्रणालीनुसार व्यवसाय करत असून कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या कोणत्याही [1][राज्य] वैद्यकीय नोंदवहीमध्ये नोंदलेली असेल किंवा नोंदली जाण्यास हक्कदार असेल ती व्यक्ती असा आहे";

(छ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम किंवा विनियम यांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(ज) "[1][राज्य] परिषद" याचा अर्थ, कलम २१ खाली घटित केलेली [1][राज्य] दंतवैद्यक परिषद असा आहे, आणि त्यामध्ये कलम २२ खालील करारानुसार घटित केलेली संयुक्त [1][राज्य] परिषद समाविष्ट आहे ;

(झ) "नोंदवही" याचा अर्थ, या अधिनियमाखाली राखलेली नोंदवही असा आहे ;

[2][(ञ) "मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्यांपैकी कोणतीही अर्हता असा आहे ;]

(ट) "दंत आरोग्यशास्त्रातील मान्यताप्राप्त अर्हता" याचा अर्थ, कलम ११ खाली परिषदेने मान्यता दिलेली कोणतीही अर्हता असा आहे ;

(ठ) "नोंदलेला दंतवैद्य", "नोंदलेला दंत आरोग्यरक्षक" व "नोंदलेला दंत कारागीर" याचा अर्थ, अनुक्रमे दंतवैद्य नोंदवही, दंत आरोग्यरक्षक नोंदवही व दंत कारागीर नोंदवही यांमध्ये त्या त्या काळी जिचे नाव नोंदलेले असेल ती व्यक्ती असा आहे.

[3]* * * *

[4]जम्मू व काश्मीर-मध्ये अंमलात नसलेल्या कायद्याच्या निर्देशांचा अर्थ लावणे.

[4][२क. जम्मू व काश्मीर राज्यात जो कायदा अंमलात नाही त्याचा या अधिनियमात जो कोणताही निर्देश असेल त्याचा त्या राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यात कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्या कायद्याचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.]

## प्रकरण २ रे

### भारतीय दंतवैद्यक परिषद

'परिषदेची घटना' व रचना.

३. केंद्र शासन, होईल तितक्या लवकर, पुढील सदस्य मिळून बनलेली एक परिषद घटित करील, ते सदस्य असे :—

[5][(क) प्रत्येक [1][राज्य] नोंदवहीतील भाग क मध्ये नोंदणी झालेल्या दंतवैद्यांनी निवडून दिलेला मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता असलेला एक नोंदलेला दंतवैद्य;

(ख) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला एक सदस्य;

[6][(ग) पुढील व्यक्तींनी त्यांच्यामधून निवडून दिलेले जास्तीत जास्त चार सदस्य त्या व्यक्ती म्हणजे—]

(क) मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हतांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या अशा राज्यांमधील दंत महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाते, संचालक व उप प्राचार्य :

परंतु, एकाच दंत महाविद्यालयामधून एकापेक्षा अधिक सदस्य निवडून देता येणार नाहीत;

(ख) मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हतांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या अशा राज्यांमधील वैद्यक महाविद्यालयांतील दंतवैद्यक शाखांचे प्रमुख;]

(घ) राज्यांमध्ये विधितः स्थापन झालेले जे जे विद्यापीठ मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता प्रदान करते अशा प्रत्येक विद्यापीठातील, विद्यापीठाच्या अधिसभेच्या सदस्यांनी किंवा त्या विद्यापीठाची अधिसभा नसेल तर विद्यापीठाच्या विधिसभेच्या सदस्यांनी विद्यापीठाच्या दंतवैद्यक विद्याशाखेच्या सदस्यांमधून किंवा त्या विद्यापीठात दंतवैद्यक विद्याशाखा नसेल तर त्याच्या वैद्यक विद्याशाखेच्या सदस्यांमधून निवडून द्यावयाचा एकेक सदस्य;

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९७२ चा अधिनियम ४२–कलम ३ द्वारे खंड (ञ) ऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

३. किता—कलम ३ द्वारे खंड (ड) गाळला (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

४. किता—कलम ४ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

५. १९५५ चा अधिनियम १२–कलम ४ द्वारे खंड (ग), (घ), (ङ) ऐवजी घातले.

६. १९७२ चा अधिनियम ४२–कलम ५ (क) द्वारे खंड (ग) ऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

(ङ) [१][ [२]* * * प्रत्येक राज्याचे ] प्रतिनिधित्व करण्यासाठी अशा प्रत्येक राज्याच्या शासनाने त्या राज्याच्या वैद्यकीय नोंदवहीमध्ये किंवा दंतवैद्यकीय नोंदवहीमध्ये नोंदणी केलेल्या व्यक्तींमधून नामनियुक्त केलेला एकेक सदस्य; ]

[३][ स्पष्टीकरण.—या खंडातील "राज्य" या शब्दामध्ये संघ राज्यक्षेत्राचा समावेश नाही; ]

(च्) केंद्र शासनाने नामनियुक्त केलेले सहा सदस्य-त्यांच्यापैकी निदान एक तरी सदस्य हा मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण केलेला व [४][ संघ राज्यक्षेत्रात ] व्यवसाय करणारा किंवा तेथे दंतवैद्यांच्या प्रशिक्षणासाठी असणाऱ्या संस्थेमध्ये नेमणूक झालेला असेल, आणि निदान दोन तरी सदस्य [५][ राज्य ] नोंदवहीच्या भाग ख मध्ये नोंदणी झालेले दंतवैद्य असतील;

[६][ (छ) महासंचालक, आरोग्य सेवा, पदसिद्ध ] :

परंतु, त्या नोंदवह्या तयार होईपावेतो, त्या त्या नोंदवह्यांमध्ये नोंदणी होण्यास पात्र असलेल्या व्यक्तींमधून प्रहिल्यावेळच्या पहिल्या परिषदेवर [५][ राज्य ] शासनाला (क्) व (ङ) या भागांमध्ये निर्देशिलेले सदस्य आणि केंद्र शासनाला भाग (च्) मध्ये निर्देशिलेले सदस्य नामनियुक्त करता येतील आणि अशा व्यक्ती [५][ राज्य ] किंवा केंद्र शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत पद धारण करतील.

परिषदेचे निगमन.

४. परिषद हा, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची संपत्ती संपादन करण्याच्या व धारण करण्याच्या शक्तीसह उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला "भारतीय दंत-वैद्यक परिषद" नावाचा निगम निकाय असेल आणि उक्त नावाने त्याला दावा लावता येईल व त्याच्यावर दावा लावण्यात येईल.

निवडणुकांची पद्धती

५. या प्रकरणाखालील निवडणुका विहित रीतीने घेतल्या जातील, आणि जेव्हा अशा कोणत्याही निवडणुकींबाबत कोणताही तंटा उद्भवेल तेव्हा, तो केंद्र शासनाकडे निर्णयार्थ निर्देशित केला जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

पदावधी व विशिष्ट-पश्चात् रिक्त होणाऱ्या जागा.]

६. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, निवडून दिलेला किंवा नामनियुक्त केलेला सदस्य त्याच्या निवडणुकीच्या किंवा नामनियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी अथवा त्याचा उत्तराधिकारी रीतसर निवडला जाईपर्यंतचा किंवा नामनियुक्त केला जाईपर्यंतचा कालावधी यांपैकी जो जास्त असेल तितक्या कालावधीपर्यंत पद धारण करील :

[७][ परंतु, कलम ३-खंड (ङ) किंवा खंड (च्) खाली नामनियुक्त केलेला सदस्य हा, त्याला नामनियुक्त करणाऱ्या प्राधिकरणाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील. ]

(२) निवडून दिलेला किंवा नामनियुक्त केलेला सदस्य केव्हाही अध्यक्षाला उद्देशून स्वाक्षरित केलेल्या लेखाद्वारे आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल आणि अशा सदस्यांची जागा त्यानंतर रिक्त होईल.

(३) निवडून दिलेला किंवा नामनियुक्त केलेला सदस्य जर परिषदेच्या मते पुरेसे होईल अशा कारणाशिवाय परिषदेच्या लागोपाठ तीन साधारण सभांना अनुपस्थित राहिला किंवा अशा ज्या सदस्याचे नाव एखाद्या [५][ राज्य ] नोंदवहीमध्ये समाविष्ट असावयास हवे त्याच्या बाबतीत जर त्याचे नाव अशा नोंदवहीमधून काढून टाकलेले असेल, किंवा तो कलम ३-खंड (ग्) खाली निवडून आलेला असून [८][ जर दंतवैद्यक महाविद्यालयाचा [९][ प्राचार्य, अधिष्ठाता, संचालक किंवा उप प्राचार्य ] म्हणून किंवा वैद्यक

---

१. अनुकूलन आदेश (क्रमांक ३) १९५६ द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून प्रत्येक भाग क राज्याचे आणि भाग ख राज्याचे" या शब्दांऐवजी घातले.

२. १९७२ चा अधिनियम ४२-कलम ५ द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र खेरीज करून" हे शब्द गाळले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता-कलम ५ द्वारे जादा दाखल केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

४. अनुकूलन आदेश (क्रमांक ३) १९५६ द्वारे "भाग ग राज्यात" या शब्दांऐवजी घातले.

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

६. १९५५ चा अधिनियम १२-कलम ४ द्वारे घातले.

७. १९७२ चा अधिनियम ४२-कलम ६ द्वारे जादा दाखल केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

८. १९५५ चा अधिनियम १२-कलम ४ द्वारे "महाविद्यालयाचा प्रमुख म्हणून झालेली त्याची नियुक्ती समाप्त झालेली असेल" या शब्दांऐवजी घातले.

९. १९७२ चा अधिनियम ४२-कलम ६ द्वारे "प्राचार्य किंवा उपप्राचार्यं" या शब्दांऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

महाविद्यालयाच्या [1][दंतवैद्यक शाखेचा प्रमुख] म्हणून झालेली त्याची नियुक्ती समाप्त झालेली असेल,] किंवा तो कलम ३-खंड (ख) किंवा (घ) खाली निवडून आलेला असून जर तो भारतीय वैद्यक परिषदेचा किंवा, प्रकरणपरत्वे, विद्यापीठाच्या [2][दंतवैद्यक किंवा वैद्यक विद्याशाखेचा] सदस्य असल्याचे बंद झाले असेल तर, त्याचे पद रिक्त झाले असल्याचे मानण्यात येईल.

(४) परिषदेमधील निमित्तवशात् रिक्त होणारे पद नवीन निवडणुकीद्वारे किंवा, प्रकरणपरत्वे, नामनियुक्ती करून भरले जाईल आणि ते रिक्तपद भरण्यासाठी निवडलेली किंवा नामनियुक्त केलेली व्यक्ती, ज्या सदस्याची जागा घेईल तो जितक्या कालावधीसाठी निवडला गेला होता किंवा नामनियुक्त केला गेला होता त्यापैकी उर्वरित कालावधीपर्यंतच पद धारण करील.

(५) परिषदेचे सदस्य फेरनिवडणुकीस किंवा फेरनामनियुक्तीस पात्र असतील.

(६) परिषदेने केलेली कोणतीही कृती परिषदेमध्ये कोणतेही रिक्त पद होते किंवा परिषदेच्या घटनेमध्ये कोणतीही उणीव होती एवढ्याच केवळ कारणास्तव प्रश्नास्पद करता येणार नाही.

**परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.** ७. (१) परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे तिच्या सदस्यांमार्फत त्यांच्यामधूनच निवडून देण्यात येतील :

परंतु, परिषद प्रथमत: घटित झाल्यापासून अध्यक्षाची निवडणूक होईपर्यंत केंद्र शासनाने याबाबतीत नामनियुक्त केलेला परिषदेचा सदस्य अध्यक्षाची कार्ये पार पाडील :

परंतु, आणखी असे की, परिषद प्रथमत: घटित झाल्यापासून पाच वर्षेपर्यन्त अध्यक्ष हा, जर केंद्र शासनाने तसे ठरवले तर, केंद्र शासनाने नामनियुक्त केलेली व्यक्ती असेल व ती केंद्र शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील आणि ती अगोदरपासून सदस्य नसेल त्याबाबतीत, ती कलम ३ मध्ये निर्देशित केलेल्या परिषदेच्या सदस्यांच्या व्यतिरिक्त एक सदस्य होईल.

(२) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा, त्या नात्याने जास्तीत जास्त पाच वर्षांपर्यन्त पद धारण करील, मात्र तो अवधी त्याच्या परिषदेच्या सदस्यत्वाच्या मुदतीपलिकडे लांबणार नाही, परंतु त्याचे परिषदेचे सदस्यत्व चालू राहिल्यास तो फेरनिवडणुकीस पात्र असेल.

**कर्मचारीवर्ग, पारिश्रमिक व भत्ते.** ८. (१) परिषद,—

(क) एक सचिव नियुक्त करील आणि परिषदेने तसे ठरवल्यास त्याला तिचा कोषाध्यक्ष म्हणून सुद्धा काम पाहता येईल;

(ख) या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडणे परिषदेला शक्य व्हावे यासाठी तिला आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी व सेवक नियुक्त करील;

(ग) सचिवाकडून किंवा अन्य कोणताही अधिकारी किंवा सेवक यांच्याकडून त्याच्या कर्तव्याचे यथायोग्य पालन व्हावे यासाठी परिषदेला आवश्यक वाटेल अशी प्रतिभूती देण्यास त्यांना फर्मावील व त्यांच्याकडून ती घेईल ;

(घ) केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीने परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य सदस्य यांची फी व भत्ते आणि परिषदेचे अधिकारी व सेवक यांचे वेतन व भत्ते व अन्य सेवाशर्ती निश्चित करील.

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषद प्रथमत: घटित झाल्यापासून पहिल्या चार वर्षांपर्यंत परिषदेचा सचिव हा केंद्र शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती असेल व तो केंद्र शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील.

**कार्यकारी समिती.** ९. (१) परिषद तिच्या सदस्यांमधून एक कार्यकारी समिती घटित करील, व या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा सर्वसाधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी अन्य समित्या घटित करू शकेल.

(२) कार्यकारी समिती ही अध्यक्ष व उपाध्यक्ष, पदसिद्ध [3][आणि महा संचालक, आरोग्य सेवा, पदसिद्ध] आणि परिषदेने निवडलेले पाच सदस्य मिळून बनलेली असेल.

(३) परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे, अनुक्रमे कार्यकारी समितीचे सभापती व उप सभापती असतील.

(४) कार्यकारी समितीचा सदस्य हा, परिषदेचा सदस्य म्हणून असलेला त्याचा पदावधी संपेपर्यन्त त्या नात्याने ते पद धारण करील परंतु, त्याचे परिषदेचे सदस्यत्व चालू राहिल्यास तो फेरनिवडणुकीस पात्र असेल.

(५) कार्यकारी समिती या अधिनियमाखाली तिला प्रदान केलेल्या शक्ती व नेमून दिलेली कर्तव्ये यांच्याशिवाय आणखी विहित करण्यात येतील अशा शक्ती वापरील व अशी कर्तव्ये पार पाडील.

---

१. १९७२ चा अधिनियम ४२–कलम ६ द्वारे, "प्राध्यापक, दंत शल्यचिकित्सा" या शब्दांऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. १९५५ चा अधिनियम १२–कलम ५ द्वारे "वैद्यकीय विद्याशाखेचा" या शब्दांऐवजी घातले.

३. १९७२ चा अधिनियम ४२–कलम ७ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

[1][१०. (१) भारतातील कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था यांद्वारे प्रदान केलेल्या ज्या दंतवैद्यकीय अर्हता अनुसूचीच्या पहिल्या भागामध्ये अंतर्भूत केलेल्या आहेत त्या या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता असतील. **दंतवैद्यकीय अर्हतांची मान्यता.**

(२) भारतातील जे प्राधिकरण किंवा संस्था अनुसूचीच्या पहिल्या भागामध्ये अंतर्भूत नसलेली दंतवैद्यकीय अर्हता प्रदान करते अशा कोणत्याही प्राधिकरणाला किंवा संस्थेला अशा अर्हतेस मान्यता मिळावी व ती त्या भागामध्ये अंतर्भूत केली जावी यासाठी अर्ज करता येईल आणि केंद्र शासनाला परिषदेशी विचारविनिमय करून व त्याला या प्रयोजनार्थ योग्य वाटेल अशी काही चौकशी करावयाची असल्यास ती करून नंतर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अनुसूचीचा पहिला भाग अशी अर्हता त्यामध्ये अंतर्भूत होईल अशाप्रकारे विशोधित करता येईल, आणि अशा कोणत्याही अधिसूचनेद्वारे असेही निर्देशित करता येईल की, अनुसूचीच्या पहिल्या भागामध्ये अशा दंतवैद्यकीय अर्हतेच्या उल्लेखासमोर, विनिर्दिष्ट दिनांकानंतर प्रदान केली गेली तरच फक्त ती मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता होईल असे घोषित करणारी नोंद केली जावी.

(३) (क) भारताबाहेरील कोणत्याही प्राधिकरणाने किंवा संस्थेने प्रदान केलेल्या ज्या दंतवैद्यकीय अर्हता अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये अंतर्भूत केलेल्या आहेत त्या, जेव्हा या अधिनियमाखाली प्रथमतः नोंदवही तयार केली जाईल तेव्हा फक्त भारतीय नागरिकांच्या नोंदणीच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता असतील.

(ख) जेव्हा भारताबाहेरील कोणत्याही प्राधिकरणाने किंवा संस्थेने प्रदान केलेल्या व भारतीय नागरिकाने धारण केलेल्या कोणत्याही दंतवैद्यकीय अर्हतेस 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ४२) याच्या प्रारंभानंतर प्रथमतः नोंदवही तयार केली गेली तेव्हा या नोंदवहीच्या प्रयोजनार्थ मान्यता मिळालेली असेल तर, केंद्र शासनाला परिषदेशी विचारविनिमय करून नंतर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अनुसूचीचा दुसरा भाग अशा तऱ्हेने मान्यता मिळालेली दंतवैद्यकीय अर्हता त्यामध्ये अंतर्भूत होईल अशा प्रकारे विशोधित करता येईल.

(४) (क) भारताबाहेरील कोणत्याही प्राधिकरणाने किंवा संस्थेने प्रदान केलेल्या ज्या दंतवैद्यकीय अर्हता अनुसूचीच्या तिसऱ्या भागामध्ये अंतर्भूत केलेल्या आहेत त्या या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता असतील, परंतु, अशी कोणतीही अर्हता धारण करणारी व्यक्ती ही भारतीय नागरिक असल्याखेरीज ती नोंदणीसाठी हक्कदार असणार नाही.

(ख) जेव्हा भारताबाहेरील कोणत्याही प्राधिकरणाने किंवा संस्थेने प्रदान केलेल्या व एखाद्या भारतीय नागरिकाने धारण केलेल्या कोणत्याही दंतवैद्यकीय अर्हतेस 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ४२) याच्या प्रारंभानंतर प्रतियोगी तत्त्वावर नव्हे तर अन्यथा मान्यता देण्यात आलेली असेल तेव्हा, केंद्र शासनाला परिषदेशी विचारविनिमय करून नंतर **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीचा तिसरा भाग अशा तऱ्हेने मान्यता मिळालेली दंतवैद्यकीय अर्हता त्यामध्ये अंतर्भूत होईल अशा प्रकारे विशोधित करता येईल.

(५) भारताबाहेरील कोणत्याही राज्यातील किंवा देशातील ज्या कोणत्याही प्राधिकरणाकडे किंवा संस्थेकडे दंतवैद्य नोंदवही राखण्याचे काम अशा राज्याच्या किंवा देशाच्या कायद्यान्वये सोपवलेले असेल त्यांच्याबरोबर परिषदेला दंतवैद्यकीय अर्हतांना मान्यता देण्याबाबतची प्रतियोगिता योजना निश्चित करण्यासाठी वाटाघाटी करता येतील आणि अशा कोणत्याही योजनेनुसार केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, अशा कोणत्याही राज्यातील किंवा देशातील कोणत्याही प्राधिकरणाने किंवा संस्थेने प्रदान केलेली अशी कोणतीही अर्हता, किंवा विनिर्दिष्ट दिनांकानंतर प्रदान केली तरच फक्त अशी अर्हता या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त अर्हता असेल, आणि अशा कोणत्याही अधिसूचनेत अनुसूचीचे विशोधन करण्यासाठी उपबंध करता येईल आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केली असेल अशी कोणतीही दंतवैद्यकीय अर्हता याप्रमाणे विशोधित केलेल्या अशा अनुसूचीमध्ये दाखल करण्यात यावी असेही निर्देशित करता येईल.

(६) केंद्र शासनाला, परिषदेशी विचारविनिमय करून नंतर, अनुसूचीमध्ये, कोणत्याही दंतवैद्यकीय अर्हतेच्या बाबतीत ती विवक्षित दिनांकापूर्वी प्रदान केली गेली तरच फक्त मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता ठरेल असे घोषित करणारी नोंद करावी असे निर्देशित करून अनुसूची विशोधित करता येईल.]

११. [2]* * * [3][राज्यातील] जे प्राधिकरण दंत आरोग्यरक्षकांना अर्हता प्रदान करते अशा कोणत्याही प्राधिकरणाला, अशा अर्हतेस मान्यता मिळवून घेण्यासाठी परिषदेकडे अर्ज करता येईल आणि परिषदेला, स्वतःला योग्य वाटेल अशी काही चौकशी करावयाची असल्यास ती करून आणि अर्ज करणारे प्राधिकरण ज्या [3][राज्यामध्ये] असेल त्या [3][राज्याच्या] शासनाशी व [4][राज्य] परिषदेशी विचारविनिमय करून नंतर असे घोषित करता येईल की, अशी अर्हता, किंवा विनिर्दिष्ट दिनांकानंतर प्रदान केली गेली तरच फक्त अशी अर्हता या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता असेल. **दंत आरोग्यरक्षकांच्या अर्हता.**

---

१. १९७२ चा अधिनियम ४२-कलम ८ द्वारे मूळ कलम १० ऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश १९५० द्वारे "भारताच्या" हे शब्द गाळले.

३. कित्ता—द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. कित्ता—द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

**दंत कारागिरांच्या अर्हता.**

१२. एखादी व्यक्ती या अधिनियमाखाली दंत कारागीर म्हणून नोंदली जाण्यास हक्कदार होण्या-पूर्वी तिला जी शिकाऊ उमेदवारी करावी लागेल अथवा प्रशिक्षण घ्यावे लागेल त्याचा कालावधी व स्वरूप आणि तिने पूर्ण करावयाच्या अन्य शर्ती परिषदेला विहित करता येतील.

**मान्यतेचा परिणाम.**

१३. अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या उप-बंधांच्या अधीनतेने,—

(क) कोणतीही मान्यताप्राप्त दंत वैद्यकीय किंवा दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता ही कोणत्याही [1][ राज्याच्या ] समुचित नोंदवहीमध्ये नाव नोंदले जाण्यासाठी पुरेशी अर्हता असेल ;

(ख) या अधिनियमाखाली पहिल्या नोंदवह्या संकलित झाल्यानंतर कोणतीही व्यक्ती, तिने मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय किंवा दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता धारण केल्याशिवाय दंत वैद्य किंवा दंत आरोग्यरक्षक म्हणून अथवा कलम १२ मध्ये निर्देशित केलेले जे प्रशिक्षण विहित आवश्यकता पूर्ण करते ते प्रशिक्षण घेतल्याशिवाय दंत कारागीर म्हणून कोणत्याही नोंदवहीमध्ये तिचे नाव नोंदले जाण्यास हक्कदार होणार नाही.

**पाठ्यक्रम व प्रशिक्षण आणि परीक्षा याबाबत माहिती मागवण्याची शक्ती.**

१४. [2]* * * [1][राज्यातील] जे प्राधिकरण कोणतेही दंतवैद्यकीय किंवा दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता प्रदान करते असे प्रत्येक प्राधिकरण अशी अर्हता मिळवण्यासाठी कोणते पाठ्यक्रम व प्रशिक्षणक्रम पुरे करावे लागतात आणि कोणत्या परीक्षा द्याव्या लागतात त्यांसंबंधी, कोणत्या कोणत्या वयाला असे पाठ्यक्रम पुरे करणे व परीक्षा देणे आवश्यक असते त्यांसंबंधी व अशी अर्हता मिळवण्याबाबतच्या सर्व-सामान्यपणे कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत त्यांसंबंधी परिषद वेळोवेळी मागवील अशी माहिती सादर करील.

**निरीक्षणे.**

१५. (१) [2]* * * [1][ राज्यामधील] जी प्राधिकरणे मान्यताप्राप्त दंत वैद्यकीय किंवा दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता प्रदान करताना त्या प्राधिकरणांनी घेतलेल्या कोणत्याही परीक्षांच्या ठिकाणी उप-स्थित राहण्यासाठी आणि प्रशिक्षण देणारी संस्था म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या कोणत्याही संस्थेचे निरीक्षण करण्यासाठी कार्यकारी समिती, तिला आवश्यक वाटतील तितके निरीक्षक, [3][ परिषदेने काही विनियम केले असल्यास त्यांच्या अधीनतेने, नियुक्त करू शकेल. ]

(२) या अधिनियमाखाली नियुक्त केलेले निरीक्षक कोणतीही परीक्षा चालू असताना ती मध्ये हस्तक्षेप करणार नाहीत, मात्र ज्या ज्या परीक्षेच्या ठिकाणी ते हजर राहतील ती प्रत्येक परीक्षा आणि ज्या ज्या संस्थेचे ते निरीक्षण करतील त्या प्रत्येक संस्थेचा पाठ्यक्रम व प्रशिक्षणक्रम हे पुरेसे आहेत किंवा कसे यावर आणि कार्यकारी समिती त्यांच्याकडून ज्यांच्या संबंधात अहवाल मागवील अशा अन्य कोणत्याही बाबींवर ते कार्यकारी समितीला अहवाल देतील.

(३) कार्यकारी समिती संबंधित प्राधिकरणाकडे किंवा संस्थेकडे अशा अहवालाची एक प्रत पाठवील आणि तसेच, संबंधित प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा त्यावर काही अभिप्राय असल्यास त्याच्या प्रती केंद्र शासनाकडे व ते प्राधिकरण किंवा संस्था जेथे असेल त्या [1][ राज्याच्या ] शासनाकडे पाठवील.

**वीक्षकांची नियुक्ती.**

[4][ १५क. (१) एखाद्या राज्यातील जे प्राधिकरण किंवा जी संस्था मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता प्रदान करते त्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा संस्थेने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेच्या ठिकाणी हजर राहणे व मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हतेसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या कोणत्याही संस्थेचे निरीक्षण करणे यांसाठी परिषदेला आवश्यक वाटतील तितके वीक्षक तिला नियुक्त करता येतील.

(२) कोणत्याही व्यक्तीची या कलमाखाली वीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल—मग ती परिषदेची सदस्य असो वा नसो—मात्र कलम १५ खाली जिला कोणत्याही निरीक्षणासाठी किंवा परीक्षेसाठी निरीक्षक म्हणून नियुक्त केलेले आहे त्या व्यक्तीची त्याच निरीक्षणासाठी किंवा परीक्षेसाठी वीक्षक म्हणून नियुक्ती करता येणार नाही.

(३) वीक्षक कोणतीही परीक्षा चालू असताना तीमध्ये हस्तक्षेप करणार नाही, मात्र ज्या ज्या परीक्षेच्या ठिकाणी तो हजर राहील ती प्रत्येक परीक्षा आणि ज्या ज्या संस्थेचे तो निरीक्षण करील त्या प्रत्येक संस्थेचा पाठ्यक्रम व प्रशिक्षणक्रम हे पुरेसे आहेत किंवा कसे यावर, आणि दंतवैद्यकीय शिक्षण देण्यासाठी विहित केलेला कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, जागा व अन्य सुविधा यांसुद्धा दंतवैद्यकीय शिक्षणाचा दर्जा पर्याप्त आहे किंवा कसे यावर आणि परिषद, त्याच्याकडून ज्यांच्या संबंधात अहवाल मागवील अशा अन्य कोणत्याही बाबींवर तो परिषदेच्या अध्यक्षाला अहवाल देईल.

---

१. अनुकूलन आदेश १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. कित्ता—द्वारे "भारताच्या" हे शब्द गाळले.

३. १९५५ चा अधिनियम १२–कलम ६ द्वारे "नियुक्त करू शकेल" याऐवजी घातले.

४. १९७२ चा अधिनियम ४२–कलम ९ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हा-पासून).

(४) कोणत्याही विशिष्ट प्रकरणामध्ये परिषदेच्या अध्यक्षाने अन्यथा निदेश दिला असल्यास तेवढे खेरीज करून एरव्ही, वीक्षकाचा अहवाल हा गोपनीय समजला जाईल :

परंतु, वीक्षकाच्या अहवालाची एक प्रत केंद्र शासनाने मागवली तर, परिषदेला ती सादर करावी लागेल. ]

मान्यता काढून घेणे.

१६. (१) जेव्हा कार्यकारी समितीच्या अहवालावरून परिषदेला असे आढळून येईल की,——

(क) [1]* * * एखाद्या [2][राज्यातील] कोणत्याही प्राधिकरणाकडून मान्यताप्राप्त [3]* * * * दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता मिळवण्यासाठी जो पाठ्यक्रम व प्रशिक्षणक्रम पुरा करावयाचा तो किंवा ज्या परीक्षा द्यावयाच्या त्या अगर अशा पाठ्यक्रमांना प्रवेश देण्याच्या शर्ती अथवा अशा परीक्षांमध्ये उमेदवारांकडून अपेक्षित असलेल्या नैपुण्याचा दर्जा हे या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांना अनुरूप नाहीत किंवा त्यांद्वारे आवश्यक केलेल्या दर्जाच्या मानाने कमी पडतात, अथवा

(ख) एखादी संस्था परिषदेने आवश्यक केलेल्या गोष्टींची पूर्तता करत नाही,

तेव्हा परिषदेला, ते प्राधिकरण किंवा संस्था जेथे असेल त्या [4][राज्याच्या] शासनाकडे तशा अर्थाचे निवेदन पाठवता येईल, आणि [4][राज्य] शासन संबंधित प्राधिकरणाकडे किंवा संस्थेकडे ते निवेदन आणि सोबत स्वतःला योग्य वाटतील असे अभिप्राय, तसेच किती कालावधीमध्ये त्या प्राधिकरणाने किंवा संस्थेने आपला खुलासा [4][राज्य] शासनाला सादर करावा त्यासंबंधीची सूचना पाठवील.

(२) खुलासा मिळाल्यानंतर, अथवा निश्चित केलेल्या कालावधीमध्ये असा कोणताही खुलासा सादर करण्यात आला नाही तर, तो कालावधी संपल्यानंतर, [4][राज्य] शासन [4][राज्य] परिषदेशी विचार-विनिमय करून नंतर आपल्या शिफारशी व [4][राज्य] परिषदेच्या काही शिफारशी असल्यास त्या शिफारशी परिषदेकडे पाठवील.

(३) परिषदेला [4][राज्य] शासन व [4][राज्य] परिषद यांच्या शिफारशींचा विचार करून आणि स्वतःला योग्य वाटेल अशी आणखी काही चौकशी करावयाची असल्यास ती करून नंतर असे घोषित करता येईल की, ते प्राधिकरण किंवा संस्था यांनी प्रदान केलेली अर्हता जर विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी दिली गेली असेल तरच फक्त ती मान्यताप्राप्त [3]* * * दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता ठरेल.

(४) परिषदेला असे घोषित करता येईल की [1]* * * [2][राज्यांच्या] बाहेर प्रदान करण्यात आलेली कोणतीही मान्यताप्राप्त [3]* * * दंत आरोग्यशास्त्रीय अर्हता जर विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी दिली गेली असेल तरच फक्त तिला तशी मान्यता मिळेल.

मान्यताप्राप्त दंत-वैद्यकीय अर्हतांची मान्यता काढून घेणे.

[5][१६क. (१) जेव्हा कार्यकारी समितीच्या अहवालावरून परिषदेला असे आढळून येईल की,——

(क) एखाद्या राज्यातील कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था यांजकडून मान्यताप्राप्त दंत-वैद्यकीय अर्हता मिळवण्यासाठी जो पाठ्यक्रम व प्रशिक्षणक्रम पुरा करावयाचा तो किंवा ज्या परीक्षा द्यावयाच्या त्या अगर अशा पाठ्यक्रमांना प्रवेश देण्याच्या शर्ती किंवा अशा परीक्षांमध्ये उमेदवारांकडून अपेक्षित असलेला नैपुण्याचा दर्जा हे या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांना अनुरूप नाहीत किंवा त्यांद्वारे आवश्यक केलेल्या दर्जाच्या मानाने कमी पडतात,

अथवा

(ख) कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, जागा, प्रशिक्षण व अन्य सुविधा यांच्या बाबतीत एखादी संस्था परिषदेने आवश्यक केलेल्या गोष्टींची पूर्तता करत नाही,

तेव्हा परिषद केंद्र शासनाकडे तशा अर्थाचे निवेदन पाठवील.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारताच्या" हे शब्द गाळले.

२. कित्ता——द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९७२ चा अधिनियम ४२—कलम १० द्वारे "दंतशास्त्रीय किंवा" हे शब्द गाळले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

५. १९७२ चा अधिनियम ४२—कलम ११ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी तेव्हापासून).

(२) अशा निवेदनाचा विचार करून नंतर केंद्र शासनाला, जेथे ते प्राधिकरण शक्तीचा वापर करीत असेल किंवा जेथे ती संस्था असेल त्या राज्यांच्या शासनाकडे ते पाठवता येईल, आणि राज्य शासन संबंधित प्राधिकरणाकडे किंवा संस्थेकडे ते निवेदन आणि सोबत, त्यावर जे अभिप्राय देणे स्वतःला योग्य वाटेल ते अभिप्राय, तसेच किती कालावधीमध्ये त्या प्राधिकरणाने किंवा संस्थेने आपला खुलासा सादर करावा त्यासंबंधीची सूचना पाठवील.

(३) तो खुलासा विचारात घेतल्यानंतर, किंवा निश्चित केलेल्या कालावधीमध्ये असा कोणताही खुलासा सादर केला गेला नाही तर तो कालावधी संपल्यानंतर राज्य शासन केंद्र शासनाकडे आपल्या शिफारशी करील.

(४) केंद्र शासन राज्य शासनाच्या शिफारशींचा विचार करून आणि स्वतःला योग्य वाटेल अशी आणखी काही चौकशी करावयाची असल्यास ती करून नंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, अनुसूचीच्या १ ल्या भागामध्ये ते प्राधिकरण किंवा संस्था यांजकडून प्रदान केल्या जाणाऱ्या अर्हतेच्या उल्लेखासमोर, जर ती विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी प्रदान करण्यात आली तरच फक्त ती मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता ठरेल किंवा उक्त मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या कोणत्याही विनिर्दिष्ट महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या विद्यार्थ्यांना दिलेली असेल त्याबाबतीत ती विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी प्रदान करण्यात आली तरच फक्त मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता ठरेल किंवा, प्रकरणपरत्वे, उक्त मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आली तरच फक्त कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या विनिर्दिष्ट महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या बाबतीत ती मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता ठरेल असे घोषित करणारी नोंद करण्यात यावी. ]

**घोषणांची पद्धती.** १७. [1]* * * कलम ११ किंवा कलम १६ खालील सर्व घोषणा परिषदेच्या सभेमध्ये संमत झालेल्या ठरावाद्वारे करण्यात येतील व त्या ताबडतोब शासकीय राजपत्रातून प्रकाशित केल्या जातील.

**व्यावसायिक वर्तन.** [2][१७क. (१) परिषदेला दंतवैद्यांसाठी व्यावसायिक वर्तन व शिष्टाचार यांचे मानदंड किंवा नीतिसंहिता विहित करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली परिषदेने केलेल्या विनियमांद्वारे असे विनिर्दिष्ट करता येईल की, त्यांचा कशाप्रकारे भंग झाला असता ते कोणत्याही व्यावसायिक बाबतीत अपकीर्तिकारक वर्तन म्हणजेच व्यावसायिक गैरवर्तन ठरेल आणि असा उपबंध त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये त्याच्या विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी परिणामक होईल. ]

**भारतीय नोंदवही.** १८. (१) परिषद 'भारतीय दंतवैद्य नोंदवही' नावाची व त्यात सर्व [3][ राज्य ] दंतवैद्य नोंदवह्यांतील नोंदी समाविष्ट असणारी अशी एक नोंदवही राखील.

(२) प्रत्येक [3][ राज्य ] परिषद प्रत्येक वर्षी १ एप्रिलनंतर होईल तितक्या लवकर [3][ राज्य ] नोंदवहीच्या वीस छापील प्रती परिषदेला पुरवील, आणि प्रत्येक निबंधक [3][ राज्य ] नोंदवहीमध्ये झालेल्या सर्व जादा नोंदी व अन्य विशोधने परिषदेला विनाविलंब कळवील.

**सादर करावयाची माहिती.** १९. (१) परिषद आपल्या कार्यवृत्तांच्या व कार्यकारी समितीच्या कार्यवृत्तांच्या प्रती आणि आपल्या लेख्यांच्या गोषवाऱ्यासह आपल्या कामकाजाचा वार्षिक अहवाल केंद्र शासनाकडे सादर करील.

(२) केंद्र शासनाला, या कलमाखाली त्याच्याकडे सादर करण्यात आलेला कोणताही अहवाल, प्रत किंवा गोषवारा त्याला योग्य वाटेल अशा रीतीने प्रकाशित करता येईल.

**विनियम करण्याची शक्ती.** २०. (१) या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी केंद्र शासनाच्या मंजुरीने परिषदेला या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांद्वारे,—

(क) परिषदेच्या संपत्तीच्या व्यवस्थापनासाठी [4]* * * उपबंध करता येईल ;

(ख) या प्रकरणाखालील निवडणुका कशा रीतीने घेतल्या जाव्यात ते विहित करता येईल ;

(ग) परिषदेच्या व कार्यकारी समितीच्या सभा बोलावणे व भरवणे, अशा सभा कोणकोणत्या वेळी व जागी भरवल्या जातील ते, त्यामधील कामकाज-चालन व गणपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणारी सदस्य-संख्या यांबाबत उपबंध करता येतील ;

---

१. १९७२ चा अधिनियम ४२–कलम १२ द्वारे "कलम १०," हे शब्द व आकडे गाळले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. किता–कलम १३ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

३. अनुकूलन आदेश १९५०, द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. १९७२ चा अधिनियम ४२–कलम १४ द्वारे "आणि लेखे ठेवणे व त्यांची परीक्षा करणे यासाठी" हे शब्द गाळले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

(घ) कार्यकारी समितीचे कार्याधिकार विहित करता येतील ;

(ङ) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या शक्ती व कर्तव्ये विहित करता येतील ;

(च) सचिव [1][आणि अन्य अधिकारी व सेवक आणि निरीक्षक व परिषदेने नियुक्त केलेले अभ्यागत] यांचा पदावधी आणि त्यांच्या शक्ती व कर्तव्ये विहित करता येतील ;]

(छ) दंतवैद्य व दंत आरोग्यरक्षक यांच्या प्रशिक्षणाचा प्रमाण अभ्यासक्रम आणि अशा प्रशिक्षणाच्या पाठ्यक्रमासाठी प्रवेश देण्याबाबतच्या शर्ती विहित करता येतील ;

(ज) अर्हतांना या अधिनियमाखाली मान्यता मिळवण्यासाठी परीक्षांचा दर्जा कसा असावा आणि अन्य कोणत्या आवश्यक बाबींची पूर्तता व्हावी ते विहित करता येईल ;

(झ) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब :

परंतु, खंड (छ) व (ज) खालील विनियम [2][राज्य] शासनाशी विचारविनिमय करून नंतर केले जातील.

(३) परिषद प्रथमतः घटित व्हावी यासाठी केंद्र शासनाला परिषदेच्या निवडणुकांचे सूत्रचालन करण्याबाबत विनियम करता येतील, आणि या कलमाखालील आपल्या शक्तींचा वापर करून परिषदेला याप्रमाणे केलेल्या कोणत्याही विनियमामध्ये फेरबदल करता येईल किंवा तो विखंडित करता येईल.

## प्रकरण ३ रे

### [2][राज्य] दंतवैद्यक परिषद

२१. कलम २२ खाली केलेल्या करारानुसार संयुक्त [2][राज्य] परिषद घटित केलेली असेल तेवढी बाबत खेरीजकरून एरव्ही, [2][राज्य] शासन पुढील सदस्य मिळून बनलेली एक [2][राज्य] परिषद घटित करील, ते असे :— राज्य परिषदांची घटना व रचना.

(क) [2][राज्य] नोंदवहीच्या भाग 'क' मध्ये नोंदणी झालेल्या दंतवैद्यांनी त्यांच्यातूनच निवडून दिलेले चार सदस्य ;

(ख) [2][राज्य] नोंदवहीच्या भाग 'ख' मध्ये नोंदणी झालेल्या दंतवैद्यांनी त्यांच्यातूनच निवडून दिलेले चार सदस्य ;

[3][(ग) अनुसूचीच्या १ ल्या भागामध्ये अंतर्भूत केलेल्यांपैकी कोणत्याही मान्यताप्राप्त दंत-वैद्यकीय अर्हतेसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणारी अशी कोणतीही दंतवैद्यक महाविद्यालये राज्या-मध्ये असल्यास त्यांचे प्रमुख, पदसिद्ध] :

(घ) [4][राज्याच्या] वैद्यक परिषदेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, वैद्यकीय नोंदणी परिषदेच्या सदस्यांनी त्यांच्यातूनच निवडून दिलेला एक सदस्य ; [5]* * * *

(ङ) [2][राज्य] शासनाने नामनियुक्त केलेले तीन सदस्य ; [5][आणि]

[5][(च) राज्याचा मुख्य वैद्यकीय अधिकारी, पदसिद्ध—मग तो कोणत्याही नावाने संबोधला जात असो :]

[6][परंतु, [7][१ नोव्हेंबर, १९५६ पूर्वी जसे अस्तित्वात होते तशा] सौराष्ट्र राज्यामध्ये १९४९ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४० याद्वारे विशोधित केलेला १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५ याखाली घटित केलेली "राज्य दंतवैद्यक परिषद" ही या अधिनियमाखाली घटित केलेली "राज्य परिषद" असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९७२ चा अधिनियम ४२–कलम १४ द्वारे "परिषदेचे निरीक्षक आणि अन्य अधिकारी व सेवक" याऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९५५ चा अधिनियम १२–कलम ७ द्वारे मूळ खंड (ग) ऐवजी घातले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

५. १९७२ चा अधिनियम ४२–कलम १५ द्वारे खंड (घ) च्या अखेरचा "आणि" हा शब्द गाळून तो खंड (ङ) च्या अखेरीस घातला व खंड (च) जादा दाखल केला (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

६. १९५५ चा अधिनियम १२–कलम ७ द्वारे समाविष्ट केले. १९५० चा अधिनियम ५८–कलम २ द्वारे मूळ परंतुक गाळण्यात आले होते.

७. अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६ द्वारे समाविष्ट केले.

'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद' आणि महाराष्ट्र व गुजरात राज्यांच्या राज्य परिषदांची घटना यांच्या संबंधात तात्पुरता उपबंध.

[1][२१क. (१) कलम २१ अन्वये घटित केलेली आणि 'आंतर-राज्यीय महामंडळे अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३८) याच्या कलम ४ खाली काढलेला 'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद (पुनर्घटना व पुनर्रचना) आदेश, १९६१' हा ज्या दिनांकाला अंमलात येणार असेल त्या दिनांकाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर आणि राजस्थान या राज्यांच्या एखाद्या भागात कार्याधिकार असणारी व कार्य करणारी 'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद' त्या दिनांकी व तेव्हापासून विसर्जित झाल्याचे मानण्यात येईल आणि कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तिच्या सदस्यांना आपली पदे रिक्त करावी लागतील.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकी व तेव्हापासून—

(क) महाराष्ट्र शासन 'महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषद' नावाची एक राज्य परिषद स्थापन करील व कलम २१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ती घटित करण्यात येईल :

परंतु, नोंदलेल्या दंतवैद्यांनी कलम २१च्या खंड (क) व (ख) अन्वये निवडून द्यावयाचे सदस्य आणि त्या कलमाच्या खंड (घ) अन्वये निवडून द्यावयाचा सदस्य हे देखील महाराष्ट्र शासनाकडून नामनियुक्त करण्यात येतील ;

(ख) गुजरात शासन 'गुजरात राज्य दंतवैद्यक परिषद' नावाची एक राज्य परिषद स्थापन करील व कलम २१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ती घटित करण्यात येईल :

परंतु, नोंदलेल्या दंतवैद्यांनी कलम २१च्या खंड (क) आणि (ख) अन्वये निवडून द्यावयाचे सदस्य आणि त्या कलमाच्या खंड (घ) अन्वये वैद्यक परिषदेने निवडून द्यावयाचा सदस्य हे देखील महाराष्ट्र शासनाकडून नामनियुक्त करण्यात येतील ;

(ग) अशाप्रकारे घटित केलेल्या 'महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषदे'चे आणि 'गुजरात राज्य दंतवैद्यक परिषदे' चे सदस्य, कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्यांच्या नामनियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीअखेरची तारीख अथवा कलम ३३क अन्वये महाराष्ट्र राज्याची किंवा, प्रकरणपरत्वे, गुजरात राज्याची 'दंतवैद्य नोंदवही' तयार करण्यात येऊन नंतर कलम २१ अन्वये 'राज्य परिषद' रीतसर घटित केली जाईल (त्यासाठी राज्य शासनाला याद्वारे अधिकार देण्यात आले आहेत) ती तारीख यांपैकी जी अगोदरची असेल त्या तारखेपर्यंत आपले पद धारण करतील ;

(घ) 'महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषदे'चे आणि 'गुजरात राज्य दंतवैद्यक परिषदे'चे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे, कलम २५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र शासनाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, गुजरात शासनाकडून राज्य परिषदेच्या सदस्यांमधून नामनियुक्त केले जातील.

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषदेला पुढील ठिकाणी कार्याधिकार राहील व तेथे ती कार्य करील: —

(एक) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकी व तेव्हापासून महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात आणि हैद्राबाद क्षेत्रात, आणि

(दोन) 'मध्य प्रदेश राज्य दंतवैद्यक परिषदे'च्या संबंधात केंद्र शासनाकडून 'आंतर-राज्यीय महामंडळे अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३८) याअन्वये काढण्यात येईल असा आदेश ज्या दिनांकाला अंमलात येईल त्या दिनांकी व तेव्हापासून महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशात.

(४) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, 'गुजरात राज्य दंतवैद्यक परिषदे' ला पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकी व तेव्हापासून गुजरात राज्याच्या संपूर्ण क्षेत्रात कार्याधिकार राहील व तेथे ती कार्य करील.

(५) कलम २१ अन्वये म्हैसूर राज्य आणि राजस्थान राज्य यांच्याकरिता राज्य परिषद रीतसर घटित केली जाईपर्यंत, म्हैसूर शासन आणि राजस्थान शासन अनुक्रमे कर्नाटक क्षेत्रात आणि अबू क्षेत्रात राज्य परिषदेचे अधिकार वापरील व तिची कार्ये करील.]

आंतर-राज्यीय करार.

२२. (१) दोन किंवा अधिक [2][राज्य] शासनांना,—

(क) सहभागी होणाऱ्या त्या सर्व [3][राज्यांसाठी] एक "संयुक्त [3][राज्य] परिषद" घटित करण्याची ; किंवा

---

१. 'आंतरराज्यीय महामंडळे अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३८)–कलम ४–पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेला 'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद (पुनर्घटना व पुनर्रचना) आदेश, १९६१'–अनुसूचीद्वारे जादा दाखल केले. (जी. एस. आर. १३६१–दिनांक ११ नोव्हेंबर १९६१–गॅझेट ऑफ इंडिया-असाधारण, १९६१–भाग दोन, विभाग ३(एक), पृष्ठ ५३१ वर प्रकाशित).

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी । शब्दोल्लेख घातला.

३. कित्ता—द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

(ख) सहभागी होणाऱ्या अन्य [1][राज्यांच्या] गरजा भागवण्यासाठी एका [1][राज्याच्या] [2][राज्य] परिषदेची तरतूद करण्यासाठी करार करता येईल व त्या करारात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत तो अंमलात राहील व त्यामध्ये आणखी काही कालावधी विनिर्दिष्ट असल्यास त्या कालावधीपर्यंत नवीकरण होण्यास तो पात्र राहील.

(२) या कलमाखाली केलेल्या कराराद्वारे या अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आहेत त्या बाबींच्या व्यतिरिक्त,——

(क) [2][राज्य] परिषद किंवा संयुक्त [2][राज्य] परिषद यांच्या संबंधातील खर्चाचे, सहभागी होणाऱ्या [1][राज्यांमध्ये] संविभाजन करण्यासाठी उपबंध करता येईल;

(ख) सहभागी होणाऱ्यांपैकी कोणत्या [2][राज्य] शासनाने या अधिनियमाखालील [2][राज्य] शासनाचे निरनिराळे कार्याधिकार बजावावे ते ठरवता येईल, आणि या अधिनियमातील [2][राज्य] शासनाच्या उल्लेखांचा अर्थ तदनुसार लावला जाईल;

(ग) सहभागी होणाऱ्या [2][राज्य] शासनांमध्ये सर्रास किंवा या अधिनियमाखाली उद्भवणाऱ्या विशिष्ट बाबींच्या संबंधात विचारविनिमय व्हावा यासाठी उपबंध करता येईल;

(घ) कराराची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे या अधिनियमाशी विसंगत नसणारे आनुषंगिक व साहाय्यभूत उपबंध करता येतील.

(३) या कलमाखालील करार, सहभागी होणाऱ्या [1][राज्यांच्या] शासकीय राजपत्रात प्रकाशित केला जाईल.

संयुक्त राज्य परिषदांची रचना.

२३. संयुक्त [2][राज्य] परिषद पुढील सदस्य मिळून बनलेली असेल, ते असे :——

(क) सहभागी होणाऱ्यांपैकी प्रत्येक [1][राज्याच्या] नोंदवहीच्या भाग 'क' मध्ये नोंदणी झालेल्या दंतवैद्यांनी त्यांच्यातूनच निवडून दिलेले दोन सदस्य ;

(ख) सहभागी होणाऱ्यांपैकी प्रत्येक [1][राज्याच्या] नोंदवहीच्या भाग 'ख' मध्ये नोंदणी झालेल्या दंतवैद्यांनी त्यांच्यातूनच निवडून दिलेले दोन सदस्य ;

[3][(ग) अनुसूचीच्या १ ल्या भागामध्ये अंतर्भूत केलेल्यांपैकी कोणत्याही मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हतेसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणारी अशी कोणतीही दंतवैद्यक महाविद्यालये सर्व सहभागी राज्यांमध्ये असल्यास त्यांचे प्रमुख, पदसिद्ध; ]

(घ) प्रत्येक सहभागी [1][राज्याच्या] वैद्यक परिषदेने किंवा, प्रकरणपरत्वे, वैद्यकीय नोंदणी परिषदेने निवडून दिलेला एकेक सदस्य ;

(ङ) सहभागी होणाऱ्या प्रत्येक [2][राज्य] शासनाने नामनियुक्त केलेले दोन सदस्य ;

[4][(च) प्रत्येक सहभागी राज्याचा मुख्य वैद्यकीय अधिकारी, पदसिद्ध—— मग तो कोणत्याही नावाने संबोधला जात असो.]

राज्य परिषदांचे निगमन.

२४. प्रत्येक [2][राज्य] परिषद हा, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची संपत्ती संपादन करण्याच्या व धारण करण्याच्या शक्तीसह शाश्वत उत्तराधिकार व सामाईक मोहोर असलेला, [2][राज्य] शासन शासकीय राजपत्रात अधिसूचित करील त्याप्रमाणे किंवा संयुक्त [2][राज्य] परिषदेच्या बाबतीत, करारामध्ये ठरवण्यात येईल त्याप्रमाणे तशा नावाचा एक निगम निकाय असेल, आणि उक्त नावाने तो दावा लावील किंवा त्याच्याविरुद्ध दावा लावण्यात येईल.

राज्य परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.

२५. (१) [2][राज्य] परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे सदस्य आपल्यामधून निवडून देतील :

परंतु, [2][राज्य] परिषद प्रथमतः घटित झाल्यापासून पाच वर्षेपर्यंत अध्यक्ष हा, जर [2][राज्य] शासनाने तसे ठरवले तर [2][राज्य] शासनाने नामनियुक्त केलेली व्यक्ती असेल व तो [2][राज्य] शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील, आणि तो अगोदर पासून सदस्य नसेल त्याबाबतीत, तो [2][राज्य] परिषदेचा, कलम २१ किंवा, प्रकरणपरत्वे, २३ मध्ये निर्देशित केलेल्या सदस्यांच्या व्यतिरिक्त एक सदस्य असेल.

(२) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा जास्तीत जास्त पाच वर्षेपर्यंत ते पद धारण करील, मात्र हा पदावधी त्याच्या [2][राज्य] परिषदेच्या सदस्यत्वाच्या मुदतीपलिकडे लांबणार नाही, परंतु त्याचे [2][राज्य] परिषदेचे सदस्यत्व चालू असले पाहिजे या शर्तीवर तो फेरनिवडणुकीस पात्र असेल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. कित्ता——द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९५५ चा अधिनियम १२—कलम ८ द्वारे खंड (ग) ऐवजी घातले.

४. १९७२ चा अधिनियम ४२—कलम १६ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

निवडणुकांची पद्धती.

२६. या प्रकरणाखालील निवडणुका विहित रीतीने घेण्यात येतील, आणि अशा कोणत्याही निवडणुकीसंबंधात कोणताही तंटा उद्भवला तर, तो [१][राज्य] शासनाकडे निर्णयार्थ सोपवण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

पदावधी व निमित्त-वशात् रिक्त होणाऱ्या जागा.

२७. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, निवडून आलेला किंवा नामनियुक्त केलेला सदस्य तो निवडून आल्याच्या किंवा त्याच्या नामनियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांची मुदत अथवा त्याचा उत्तराधिकारी रीतसर निवडून येईपर्यंतची किंवा नामनियुक्त होईपर्यंतची मुदत यांपैकी जी अधिक असेल अशा मुदतीपर्यंत पद धारण करील :

[३][परंतु, कलम २१-खंड (ङ) किंवा कलम २३-खंड (ङ) खाली नामनियुक्त केलेला सदस्य हा त्याला नामनियुक्त करणाऱ्या प्राधिकरणाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील.]

(२) निवडून आलेला वा नामनियुक्त केलेला सदस्य अध्यक्षाला कोणत्याही वेळी उद्देशून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल, व तदनंतर अशा सदस्याची जागा रिक्त होईल.

(३) निवडून आलेल्या वा नामनियुक्त केलेल्या सदस्याची जागा पुढील बाबतींत रिक्त झाली असल्याचे मानण्यात येईल,—

(क) जर तो [१][राज्य] परिषदेच्या मते पुरेशी असेल अशा सबबीशिवाय [१][राज्य] परिषदेच्या लागोपाठच्या तीन सामान्य सभांना अनुपस्थित राहिला तर, किंवा

(ख) ज्या सदस्याचे नाव कोणत्याही [१][राज्य] नोंदवह्यांमध्ये अंतर्भूत होणे आवश्यक असेल त्याच्या बाबतीत जर, त्याचे नाव नोंदवह्यांमधून काढून टाकलेले असेल तर, किंवा

(ग) तो कलम २१-खंड (घ) किंवा कलम २३-खंड (घ) खाली निवडून आलेला असेल त्याबाबतीत, जर त्याचे [१][राज्याच्या] वैद्यकीय परिषदेचे किंवा, प्रकरणपरत्वे, वैद्यकीय नोंदणी परिषदेचे सदस्यत्व संपुष्टात आले तर.

(४) [१][राज्य] परिषदेमधील निमित्तवशात् रिकामी झालेली जागा ही नव्याने निवडणूक घेऊन किंवा, प्रकरणपरत्वे, नामनियुक्ती करून भरली जाईल, आणि ती रिक्त जागा भरण्यासाठी निवडलेली किंवा नामनियुक्त केलेली व्यक्ती ज्या सदस्याची जागा घेईल तो जितक्या कालावधीसाठी निवडला गेला होता किंवा नामनियुक्त केला गेला होता त्यापैकी उर्वरित कालावधीपर्यंतच ती व्यक्ती पद धारण करील.

(५) [१][राज्य] परिषदेचे सदस्य फेरनिवडणुकीस किंवा पुन्हा नामनियुक्त होण्यास पात्र असतील.

(६) [१][राज्य] परिषदेने केलेली कोणतीही कृती केवळ [१][राज्य] परिषदेमध्ये कोणतीही जागा रिक्त होती किंवा तिच्या घटनेमध्ये कोणताही दोष होता एवढ्याच कारणास्तव प्रश्नास्पद ठरवता येणार नाही.

कर्मचारीवर्ग, पारि-श्रमिक व भत्ते.

२८. (१) [१][राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीने [१][राज्य] परिषदेला,—

(क) एक निबंधक नियुक्त करता येईल व तो सचिव म्हणून आणि [१][राज्य] परिषदेने तसे ठरवल्यास तिचा कोषाध्यक्ष म्हणून सुद्धा काम पाहील ;

(ख) या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडणे [१][राज्य] परिषदेला शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे अन्य अधिकारी व सेवक नियुक्त करता येतील ;

(ग) निबंधकाकडून किंवा अन्य कोणताही अधिकारी किंवा सेवक याच्याकडून, त्याच्या कर्तव्यांचे योग्य तऱ्हेने पालन व्हावे यासाठी [१][राज्य] परिषदेला आवश्यक वाटेल अशी प्रतिभूती त्याच्याकडे मागता येईल व त्याच्याकडून ती घेता येईल ;

(घ) [१][राज्य] परिषदेचा निबंधक आणि अन्य अधिकारी व सेवक यांचे पगार व भत्ते आणि अन्य सेवा शर्ती निश्चित करता येतील ;

(ङ) [१][राज्य] परिषदेच्या सदस्यांना प्रदेय असणाऱ्या भत्त्यांचा दर निश्चित करता येईल.

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [२][राज्य] परिषद प्रथमत: घटित झाल्यापासून पहिल्या चार वर्षांपर्यंत [१][राज्य] परिषदेचा निबंधक हा [१][राज्य] शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती असेल व ती [१][राज्य] शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. कित्ता—द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९७२ चा अधिनियम ४२-कलम १७ द्वारे जादा दाखल केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२९. (१) [1][राज्य] परिषद तिच्या सदस्यांमधून एक कार्यकारी समिति घटित करील आणि ती अध्यक्ष व उपाध्यक्ष, पदसिद्ध [2][आणि संबंधित राज्याचा किंवा राज्यांचा मुख्य वैद्यकीय अधिकारी, पदसिद्ध—मग तो कोणत्याही नावाने संबोधला जात असो—] आणि विहित करण्यात येतील तितके [1][राज्य] परिषदेने निवडून दिलेले अन्य सदस्य मिळून बनलेली असेल. कार्यकारी समिति.

(२) [1][राज्य] परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे अनुक्रमे कार्यकारी समितीचे सभापती व उप-सभापती असतील.

(३) कार्यकारी समितीचा सदस्य या नात्याने तो, [1][राज्य] परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी संपेपर्यंत ते पद धारण करील, परंतु त्याचे [1][राज्य] परिषदेचे सदस्यत्व चालू असले पाहिजे या शर्तीवर तो फेरनिवडणुकीस पात्र असेल.

(४) कार्यकारी समिति विहित करण्यात येईल त्याप्रमाणे तशा शक्तींचा वापर करील व तशी कामे पार पाडील.

३०. (१) [1][राज्य] शासन वेळोवेळी मागवील त्याप्रमाणे [1][राज्य] परिषद तसे अहवाल, आपल्या कार्यवृत्तांच्या व कार्यकारी समितीच्या कार्यवृत्तांच्या प्रती, आणि आपल्या लेख्यांचे गोषवारे [1][राज्य] शासनाला सादर करील आणि [1][राज्य] शासनाला याप्रमाणे सादर केलेल्या सर्व सामग्रीच्या प्रती परिषदेकडे पाठवील. माहिती सादर करणे.

(२) [1][राज्य] शासनाला, या कलमाखाली त्याच्याकडे सादर केलेला कोणताही अहवाल, प्रत किंवा गोषवारा हे स्वतःला योग्य वाटेल अशा रीतीने प्रकाशित करता येईल.

## प्रकरण ४ थे

### नोंदणी

३१. (१) [1][राज्य] शासन, होईल तेवढ्या लवकर, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने [1][राज्याकरता] एक दंतवैद्य नोंदवही तयार करण्याची तजवीज करील. नोंदवही तयार करणे व राखणे.

(२) [1][राज्य] परिषद, ती घटित झाल्यानंतर, या अधिनियमाच्या उपबंधानुसार नोंदवही राखण्याचे काम अंगीकारील.

(३) दंतवैद्य नोंदवही 'क' व 'ख' अशा दोन भागांमध्ये राखण्यात येईल—मान्यताप्राप्त दंत-वैद्यकीय अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींची नोंदणी भाग 'क' मध्ये करण्यात येईल आणि अशा अर्हता धारण न करणाऱ्या व्यक्तींची नोंदणी भाग 'ख' मध्ये करण्यात येईल.

(४) नोंदवहीत पुढील तपशील अंतर्भूत असेल, तो असा :—

(क) नोंदलेल्या व्यक्तीचे पूर्ण नाव, राष्ट्रीयत्व आणि घरचा पत्ता;

(ख) नोंदवहीत तिची प्रथमतः नोंद केल्याचा दिनांक ;

(ग) नोंदणीकरता लागणारी तिची अर्हता, आणि दंतवैद्यकशास्त्रामध्ये तिने कोणतीही पदवी किंवा पदविका मिळवली असल्यास, ती जेव्हा संपादन केली तो दिनांक, आणि ती ज्याने प्रदान केली ते प्राधिकरण ;

(घ) तिच्या व्यवसायाच्या ठिकाणाचा पत्ता, आणि

(ङ) विहित करण्यात येईल असा आणखी तपशील.

३२. (१) दंतवैद्य नोंदवही प्रथमतः तयार करण्याच्या प्रयोजनार्थ [1][राज्य] शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीन व्यक्ती मिळून बनलेले असे एक नोंदणी अधिकरण घटित करील आणि एका निबंधकाचीही नियुक्ती करील व तो अधिकरणाचा सचिव म्हणून काम पाहील. नोंदवही प्रथमतः तयार करणे.

(२) कोणत्या दिनांकास किंवा दिनांकापूर्वी नोंदणी अधिकरणाकडे नोंदणीसाठी अर्ज करावा लागेल व त्यासोबत विहित फी द्यावी लागेल ते [1][राज्य] शासन त्याच किंवा तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे नियत करील.

(३) नोंदणी अधिकरण नियत दिनांकास किंवा तत्पूर्वी त्याच्याकडे आलेल्या प्रत्येक अर्जाची तपासणी करील, आणि अर्जदार कलम ३३ खाली नोंदला जाण्यास अर्ह आहे अशी स्वतःची खात्री झाली तर ते अर्जदाराच्या नावाची नोंदवहीत नोंद करण्याचा निदेश देईल.

(४) अशा प्रकारे तयार केलेली नोंदवही, [1][ राज्य ] शासन निदेश देईल अशा रीतीने त्यानंतर प्रकाशित करण्यात येईल, आणि अशा रीतीने प्रकाशित झालेल्या नोंदवहीनुसार नोंदणी अधिकरणाचा जो निर्णय

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९७२ चा अधिनियम ४२–कलम १८ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्राप्त' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

व्यक्त किंवा उपलक्षित झाला असेल त्यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा प्रकाशनाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, [१][राज्य] शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत नियुक्त केलेल्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

(५) निबंधक पोटकलम (४) खाली नियुक्त केलेल्या प्राधिकरणाच्या निर्णयानुसार नोंदवही विशोधित करील आणि त्यानंतर, ज्या ज्या व्यक्तीचे नाव नोंदवहीत दाखल करण्यात आले आहे अशा प्रत्येक व्यक्तीस विहित नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(६) [१][राज्य] परिषद घटित करण्यात आल्यावर, नोंदवही तिच्या हवाली करण्यात येईल, आणि [१][राज्य] शासन असे निदेशित करू शकेल की, पहिल्या नोंदवहीतील नोंदणीसाठी आलेल्या अर्जाची संपूर्ण फी किंवा तिचा कोणताही विनिर्दिष्ट अंश [१][राज्य] परिषदेच्या खाती जमा करण्यात यावा.

**नोंदवही प्रथमतः तयार केल्यानंतर नोंद केली जाण्यासाठी अर्हता.**

३३. (१) जर एखादी व्यक्ती [२][राज्यात] राहात असेल किंवा दंतवैद्यकाचा व्यवसाय करीत असेल आणि तिने—

(क) मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण केली असेल तर, किंवा

(ख) अशी अर्हता धारण केली नसली तरी, ती [३][भारताचा नागरिक] असून, [४][कलम ३२–पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकापूर्वी] किमान पाच वर्षे एवढा काळ आपल्या चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून ती दंतवैद्यकाचा व्यवसाय करीत असेल तर विहित फी दिल्यावर तिचे नाव नोंदवहीत दाखल केले जाण्यास ती हक्कदार होईल:

परंतु, [३][भारताचा नागरिक] सोडून अन्य कोणतीही व्यक्ती पुढील अर्हतेच्या आधारे नोंदणीस हक्कदार होणार नाही—

(क) अनुसूचीच्या १ ल्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता—मात्र अशी व्यक्ती ज्या राज्यातील किंवा देशातील असेल तेथील कायदा व प्रथा यांनुसार, त्या राज्यात किंवा देशात नोंदणीस पात्र असलेल्या दंतवैद्यकीय अर्हता धारण करणाऱ्या मूळच्या भारतीय व्यक्तींना अशा राज्यात किंवा देशात दंतवैद्यकाच्या व्यवसायामध्ये प्रवेश करण्याची व असा व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली असेल तर गोष्ट अलाहिदा—किंवा

[६][(ख) कलम १०–पोटकलम (५) खाली प्रतियोगितेच्या योजनेस अनुसरून, मान्यता देण्यात आलेली अर्हता :]

परंतु आणखी असे की, एखादी व्यक्ती [३][भारताचा नागरिक] असेल तरच फक्त अनुसूचीचा [७][भाग २रा] यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हतेच्या आधारे नोंदणीस हक्कदार होईल:

[५][परंतु आणखी असे की, या अधिनियमाखाली दंतवैद्यांची नोंदवही प्रथमतः तयार करण्याच्या प्रयोजनार्थ, पुढील बाबतीत एखादी व्यक्ती कोणतीही नोंदणी फी भरल्याशिवाय त्या नोंदवहीच्या समुचित भागात तिचे नाव दाखल केले जाण्यास हक्कदार होईल—

(क) [९][१ नोव्हेंबर, १९५६ पूर्वी जे सौराष्ट्र राज्य अस्तित्वात होते त्याराज्यात] सौराष्ट्र राज्यात]–जर १९४९ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४० याद्वारे विशोधित करण्यात आलेला असा १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५ या खाली राखलेल्या दंतवैद्यक व्यवसायी नोंदवहीत तिची नोंदणी करण्यात आली असेल तर; किंवा

(ख) [९][१ नोव्हेंबर, १९५६ पूर्वी जे त्रावणकोर कोचीन राज्य अस्तित्वात होते त्या राज्यात] —जर त्रावणकोर वैद्यक व्यवसायी अधिनियम, १११९ याखाली राखलेल्या दंतवैद्य व्यवसायी नोंदवहीत तिची नोंदणी करण्यात आली असेल तर]; [८][किंवा]

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. कित्ता—द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. कित्ता—द्वारे "भारतात अधिवास करणारा ब्रिटिश नागरिक" या ऐवजी घातले.

४. १९५५ चा अधिनियम १२-कलम ९ द्वारे "या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी" याऐवजी घातले.

५. कित्ता—कलम ९ द्वारे शेवटच्या परंतुकाऐवजी घातले.

६. १९७२ चा अधिनियम ४२-कलम १९ द्वारे खंड (ख) ऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

७. कित्ता—कलम १९ द्वारे "भाग ३ रा" याऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

८. कित्ता—कलम १९ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

९. अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६ द्वारे समाविष्ट केले.

[1][ (ग्) जम्मू व काश्मीर राज्यात—जर 'जम्मू व काश्मीर दंतवैद्य अधिनियम, १९५८' (१९५८ चा ज. व का. अधिनियम ९) याखाली राखलेल्या दंतवैद्यक व्यवसायी नोंदवहीत तिची नोंदणी करण्यात आली असेल तर.]

(२) [2] * * * एखादा [3][राज्यात] अधिवासी असलेली व्यक्ती, [4][कलम ३२–पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकापूर्वीच्या] पाच वर्षांच्या कालावधीत किमान दोन वर्षे एवढा काळ आपल्या चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून ती दंतवैद्याचा व्यवसाय करीत असेल तर, विहित फी दिल्यावर, पाच वर्षांच्या कालावधीकरता, दंतवैद्य म्हणून तात्पुरती नोंदणी होण्यास हक्कदार होईल, आणि अशा रीतीने नोंदणी करण्यात आलेली व्यक्ती, [5][तिची तात्पुरती नोंदणी झाल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत दंतवैद्य म्हणून व्यवसाय करीत असेल] तर, ती कायमची नोंदणी होण्यास हक्कदार होईल.

[6]महाराष्ट्र राज्य आणि गुजरात राज्य यांच्या दंतवैद्य नोंदवह्यांच्या संबंधात उपबंध.

[6][३३क. (१) (क्) 'आंतरराज्यीय महामंडळे अधिनियम, १९५७' '(१९५७ चा ३८)' याच्या कलम ४ अन्वये काढण्यात आलेला 'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद (पुनर्घटना आणि पुनर्रचना) आदेश, १९६१' हा ज्या दिनांकाला अंमलात येणार त्या दिनांकानंतर शक्य तितक्या लवकर, महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषद, कलमे ३१, ३२ आणि ३३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्यानंतर महाराष्ट्र राज्याची एक दंतवैद्य नोंदवही तयार करील व राखील. कलम ३१ अन्वये तयार केलेल्या आणि राखलेल्या, भूतपूर्व मुंबई राज्याच्या आणि भूतपूर्व कच्छ राज्याच्या दंतवैद्य नोंदवहीत नावे समाविष्ट असलेल्या ज्या दंतवैद्यांचे त्या नोंदवहीत नियत दिनांकास दाखवल्याप्रमाणे निवासी पत्ते गुजरात राज्याच्या राज्यक्षेत्रात अथवा कर्नाटक किंवा अबू क्षेत्रात मोडत नाहीत अशा सर्व दंतवैद्यांची नावे आणि याच पद्धतीने तयार केलेल्या व राखलेल्या, भूतपूर्व मध्य प्रदेशाच्या दंतवैद्य नोंदवहीत नावे समाविष्ट असलेल्या ज्या दंतवैद्यांचे त्या नोंदवहीत उपरोक्त दिनांकाला दाखवल्याप्रमाणे निवासी पत्ते महाराष्ट्र राज्याच्या राज्यक्षेत्रात मोडतात अशा सर्व दंतवैद्यांची नावे या नोंदवहीत समाविष्ट केली जातील :

परंतु, महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषदेला कलम २१ क-पोटकलम (३)-खंड (दोन) अन्वये महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशात कार्याधिकार प्राप्त होऊन ती कार्य करण्यास प्रारंभ करीतोपर्यंत, भूतपूर्व मध्य प्रदेश राज्याच्या नोंदवहीतील दंतवैद्यांची नावे महाराष्ट्र राज्याच्या नोंदवहीत समाविष्ट केली जाणार नाहीत;

(ख्) महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रातील कोणत्याही भागात राहणाऱ्या किंवा दंतवैद्यकीचा व्यवसाय करणाऱ्या आणि कलम ३३ मध्ये दिलेल्या नोंदणीच्या संबंधातील शर्ती पूर्ण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषदेकडे उपरोक्त दिनांकापासून एक वर्षाच्या आत विहित नमुन्यात विहित फीसह अर्ज केल्यास, त्या व्यक्तीला या नोंदवहीत नाव नोंदवून घेण्याचा हक्क प्राप्त होईल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, कलम ३३-पोटकलम (१)-खंड (ख्) आणि कलम ३३ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या कालावधीची संगणना उपरोक्त दिनांकाच्या संदर्भात केली जाईल.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर शक्य तितक्या लवकर, गुजरात राज्य दंतवैद्यक परिषद ही, कलमे ३१, ३२ व ३३ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्यानंतर गुजरात राज्याची एक दंतवैद्य नोंदवही तयार करील व राखील. कलम ३१ अन्वये रीतसर तयार केलेल्या आणि राखलेल्या, भूतपूर्व मुंबई राज्याच्या आणि भूतपूर्व कच्छ राज्याच्या दंतवैद्य नोंदवहीत नावे समाविष्ट असलेल्या ज्या दंतवैद्यांचे आणि १९४९ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४० याद्वारे विशोधित केलेला १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५ याअन्वये तयार केलेल्या दंतवैद्य नोंदवहीत नावे समाविष्ट असलेल्या ज्या दंतवैद्यांचे निवासी पत्ते उपरोक्त दिनांकाला दाखवल्याप्रमाणे गुजरात राज्याच्या राज्यक्षेत्रात मोडतात अशा सर्व दंतवैद्यांची नावे या नोंदवहीत समाविष्ट केली जातील.

---

१. १९७२ चा अधिनियम ४२–कलम १९ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारताच्या" हे शब्द गाळले.

३. कित्ता—द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. १९५५ चा अधिनियम १२–कलम ९ द्वारे "या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वीच्या" याऐवजी घातले.

५. कित्ता—कलम ९ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

६. 'आंतरराज्यीय महामंडळे अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३८), कलम ४-पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेला 'मुंबई राज्य दंतवैद्यक परिषद (पुनर्घटना व पुनर्रचना) आदेश, १९६१'–अनुसूचीद्वारे जादा दाखल केले [जी.एस.आर. १३६१, दिनांक ११ नोव्हेंबर, १९६१, गॅझेट ऑफ इंडिया–असाधारण, १९६१ भाग दोन, विभाग ३ (एक), पृ. ५३१ वर प्रकाशित].

(३) पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) अन्वये महाराष्ट्र राज्याची किंवा गुजरात राज्याची नवीन 'दंतवैद्य नोंदवही' तयार करण्यात येईपर्यंत, कलम ३१ अन्वये रीतसर तयार करण्यात आलेली आणि पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात आणि गुजरात राज्याच्या मुंबई आणि, प्रकरणपरत्वे, कच्छ क्षेत्रात अंमलात असलेली नोंदवही ही, महाराष्ट्र राज्याच्या किंवा, प्रकरणपरत्वे, गुजरात राज्याच्या ज्या क्षेत्रात ती अंमलात होती त्या क्षेत्रात अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(४) कलम ३१ अन्वये रीतसर तयार केलेल्या आणि राखलेल्या, भूतपूर्व मुंबई राज्याच्या आणि भूतपूर्व कच्छ राज्याच्या दंतवैद्य नोंदवहीत समाविष्ट असलेल्या ज्या दंतवैद्यांचे, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाला त्या नोंदवहीत दाखवल्याप्रमाणे असलेले निवासी पत्ते नवीन म्हैसूर राज्याकडे हस्तांतरित केलेल्या भूतपूर्व मुंबई राज्याच्या किंवा नवीन राजस्थान राज्याकडे हस्तांतरित केलेल्या भूतपूर्व मुंबई राज्याच्या क्षेत्रात मोडतात अशा सर्व दंतवैद्यांना विहित फी द्यावी न लागता, आपली नावे म्हैसूर राज्याच्या किंवा, प्रकरणपरत्वे, राजस्थान राज्याच्या दंतवैद्य नोंदवहीत समाविष्ट करून घेण्याचा हक्क राहील.]

नंतरच्या नोंदणी-साठी अर्हता.

३४. [१][(१)] कलम ३२-पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकानंतर एखादी व्यक्ती, जर ती [२][राज्यात] रहात असेल किंवा दंतवैद्यकीचा व्यवसाय करीत असेल आणि तिने—

(एक) मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण केली असेल तर, किंवा

(दोन) अशी अर्हता धारण केली नसली तरी, ती [३][भारताचा नागरिक] असून [४][कलम ३२-पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकापूर्वी किमान दोन वर्षे] एवढा काळ आपल्या चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून ती दंतवद्याचा व्यवसाय करीत असेल आणि [५][केंद्र शासनाकडून] या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त अशी एखादी परीक्षा [६][उक्त दिनांकानंतर दहा वर्षांच्या] अवधीत उत्तीर्ण झाली असेल तर,

विहित फी दिल्यावर तिचे नाव नोंदवहीत दाखल केले जाण्यास हक्कदार होईल :

परंतु, [३][भारताचा नागरिक] सोडून अन्य कोणतीही व्यक्ती पुढील अर्हतेच्या आधारे नोंदणीस हक्कदार होणार नाही—

(क) अनुसूचीच्या १ ल्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हतापात्र अशी व्यक्ती ज्या राज्यातील किंवा देशातील असेल तेथला कायदा व प्रथा यांनुसार, त्या राज्यात किंवा देशात नोंदणीस पात्र असलेल्या दंतवैद्यकीय अर्हता धारण करणाऱ्या मूळच्या भारतीय व्यक्तींना अशा राज्यात किंवा देशात दंतवैद्यकीच्या व्यवसायामध्ये प्रवेश करण्याची व असा व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली असेल तर गोष्ट अलाहिदा, किंवा

[७][(ख) कलम १०-पोटकलम (५) खाली प्रतियोगितेच्या योजनेस अनुसरून मान्यता देण्यात आलेली अर्हता :]

परंतु आणखी असे की, नोंदवहीच्या भाग ख मध्ये नोंदलेली व्यक्ती, [८][भाग ख मध्ये तिची नोंदणी झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षे] इतक्या कालावधीत ती [५][केंद्र शासनाने] त्या प्रयोजनाकरता मान्यता दिलेली परीक्षा उत्तीर्ण झाली तर, भाग क मध्ये नोंदणी केली जाण्यास हक्कदार होईल.

[९][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत] असले तरी,—

(क) जी व्यक्ती मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण करीत नसली तरी, दिनांक २९ मार्च, १९४८ पूर्वीच्या दिनांकापासून आपल्या चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून दंतवैद्यकीचा व्यवसाय प्रत्यक्षपणे करीत आलेली आहे अशा कोणत्याही विस्थापित व्यक्तीची राज्य नोंदवहीत नोंदणी

---

१. १९५५ चा अधिनियम १२—कलम १० द्वारे कलम ३४ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. कित्ता—द्वारे "भारतात अधिवास करणारा ब्रिटिश नागरिक" याऐवजी घातले.

४. १९५५ चा अधिनियम १२—कलम १० द्वारे "या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दोन वर्षे" याऐवजी घातले.

५. १९७२ चा अधिनियम ४२—कलम २० द्वारे 'परिषदेकडून' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

६. १९५५ चा अधिनियम १२—कलम १० द्वारे "या अधिनियमाच्या प्रारंभानंतर पाच वर्षांच्या" याऐवजी घातले.

७. १९७२ चा अधिनियम ४२-कलम २० द्वारे खंड (ख) ऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

८. १९५५ चा अधिनियम १२—कलम १० द्वारे "पाच वर्षे" या ऐवजी घातले.

९. कित्ता—कलम १० द्वारे समाविष्ट केले.

करण्यासाठी पुरेशा कारणास्तव [1][राज्य परिषद] 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, [2][१९५५]' (१९५५ चा १२) याच्या प्रारंभाच्या लगतनंतरच्या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये परवानगी देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**—या खंडातील "विस्थापित व्यक्ती" याचा अर्थ, भारत व पाकिस्तान अशा दोन अधिसत्ता स्थापन झाल्यामुळे अथवा आता पाकिस्तानचा एक भाग झालेल्या कोणत्याही क्षेत्रातील मुलकी दंग्याधोप्यांमुळे किंवा अशा दंग्याधोप्यांच्या भितीमुळे १ मार्च, १९४७ नंतर जिने अशा क्षेत्रातील आपले राहाण्याचे ठिकाण सोडले असून किंवा त्या जागेतून जिला विस्थापित करण्यात आले असून जी व्यक्ती तेव्हापासून भारतात राहात आहे अशी कोणतीही व्यक्ती असा आहे ;

[3][(कक्) जी व्यक्ती कोणतीही मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण करीत नसली तरी, दिनांक २९ मार्च, १९४८ पूर्वीच्या दिनांकापासून आपल्या चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून दंतवैद्यकाचा व्यवसाय प्रत्यक्षपणे करीत आहे अशा कोणत्याही विस्थापित व्यक्तीची किंवा स्वदेश-प्रत्यावर्तित व्यक्तीची राज्य नोंदवहीत नोंदणी करण्यासाठी पुरेशा कारणास्तव [1][राज्य] परिषद 'दंतवैद्य (विशोधन) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ४२) याच्या प्रारंभाच्या लगतनंतरच्या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये परवानगी देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**—या खंडात,—

(एक) "विस्थापित व्यक्ती" याचा अर्थ, आता बांगला देशचा एक भाग झालेल्या कोणत्याही क्षेत्रातील मुलकी दंग्याधोप्यांमुळे किंवा अशा दंग्याधोप्यांच्या भीतीमुळे १४ एप्रिल, १९५७ नंतर, परंतु २५ मार्च, १९७१ पूर्वी जिने अशा क्षेत्रातील आपले राहण्याचे ठिकाण सोडले असून किंवा त्या जागेतून जिला विस्थापित करण्यात आले असून जी व्यक्ती तेव्हापासून भारतात राहात आहे अशी कोणतीही व्यक्ती असा आहे ;

(दोन) "स्वदेशप्रत्यावर्तित व्यक्ती" याचा अर्थ, आता ब्रह्मदेश किंवा सिलोन या देशांचा एक भाग झालेल्या कोणत्याही क्षेत्रातील मुलकी दंग्याधोप्यांमुळे किंवा अशा दंग्याधोप्यांच्या भीतीमुळे १४ एप्रिल, १९५७ नंतर जिने अशा क्षेत्रातील आपले राहाण्याचे ठिकाण सोडले असून किंवा त्या जागेतून जिला विस्थापित करण्यात आले असून जी व्यक्ती तेव्हापासून भारतात राहात आहे, अशी कोणतीही व्यक्ती असा आहे ; ]

(ख) भारताच्या नागरिकाव्यतिरिक्त जी अन्य व्यक्ती मान्यवर दंतवैद्यकीय अर्हता धारण करणारी आणि राज्यांपैकी कोणत्याही राज्यातील दंतवैद्यक संस्थेत अध्यापन किंवा संशोधन यासाठी नोकरीस असेल तिला, [4]* * * तिच्या नोकरीचा कालावधी किंवा पाच वर्षांचा कालावधी यांपैकी जो कमी असेल अशा कालावधीपुरती राज्य दंतवैद्य नोंदवहीत तिची तात्पुरती नोंदणी करण्यास परवानगी देता येईल :

परंतु, तिने व्यक्तिगत लाभासाठी दंतवैद्यकाचा व्यवसाय करता कामा नये आणि नोंदणीसाठी आलेला तिचा अर्ज परिषदेच्या अध्यक्षाने संमत केलेला असला पाहिजे. ]

नोंदणीकरता आलेल्या अर्जांची छाननी.

३५. (१) पहिल्या दंतवैद्य नोंदवहीतील नोंदणीसाठी करावयाचे अर्ज स्वीकारण्याकरता नियत केलेल्या दिनांकानंतर, नोंदणीसाठी करण्यात येणारे सर्व अर्ज [1][राज्य] परिषदेच्या निबंधकास उद्देशून करावे लागतील आणि त्यांसोबत विहित फी पाठवावी लागेल.

(२) नोंदवहीत नाव दाखल केले जाण्यास अर्जदार हक्कदार आहे असे जर निबंधकाचे अशा अर्जावरून मत झाले तर, तो तदनंतर अर्जदाराचे नाव नोंदवहीत दाखल करील :

परंतु, या अधिनियमाच्या उपबंधाखाली जिचे नाव कोणत्याही [5][राज्याच्या] नोंदवहीतून काढून टाकण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती, तिचे नाव जिच्या नोंदवहीतून काढून टाकण्यात आले आहे अशा [6][राज्य] परिषदेच्या मान्यतेखेरीज, तिचे नाव नोंदवहीत दाखल केले जाण्यास हक्कदार होणार नाही.

(३) ज्या व्यक्तीचा नोंदणीसाठी आलेला अर्ज निबंधकाने फेटाळून लावला आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, तो याप्रमाणे फेटाळून लावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, [1][राज्य] परिषदेकडे अपील करता येईल, आणि [1][राज्य] परिषदेचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(४) या कलमाखाली एखाद्या नावाची नोंदवहीत नोंद घेतल्यावर निबंधक, विहित नमुन्यात एक नोंदणी प्रमाणपत्र देईल.

---

१. १९७२ चा अधिनियम ४२—कलम २० द्वारे "राज्य दंतवैद्यक परिषद" याऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. १९५७ चा अधिनियम ३६—कलम ३ आणि अनुसूची दोन यांद्वारे "१९५४" याऐवजी घातले.

३. १९७२ चा अधिनियम ४२—कलम २० द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम २० द्वारे "प्रतियोगितेचा कोणत्याही प्रकारे विचार न करता" हे शब्द गाळले.

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

६. कित्ता—द्वारे 'प्रांत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

दंतवैद्य नोंदवही विशोधित करण्यासाठी विशेष उपबंध.

[२][३५क. (१) या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, निबंधकास, आंध्र राज्य स्थापन झाल्या कारणाने ज्या व्यक्तीने मद्रासमध्ये राहण्याचे अथवा तेथे दंतवैद्यकीचा धंदा किंवा व्यवसाय चालवण्याचे बंद केले आहे अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव लेखी आदेशाद्वारे नोंदवहीतून काढून टाकून ती नोंदवही विशोधित करता येईल :

परंतु, निबंधक, आदेश काढण्यापूर्वी, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करील.

(२) पोटकलम (१) खालील आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, मद्रास राज्य शासन यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाकडे व अशा मुदतीत अपील करता येईल, आणि अपीलान्ती असे प्राधिकरण त्यास योग्य वाटेल असा आदेश काढील.

(३) निबंधकाचा पोटकलम (१) खालील आदेश, किंवा पोटकलम (२) खाली त्याविरुद्ध अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत अपील प्राधिकरणाचा आदेश अंतिम असेल.

(४) या कलमातील उपबंध, मद्रास राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून अंमलात असण्याचे बंद होईल.]

दंत आरोग्यरक्षक व दंत कारागीर यांच्या नोंदवह्या.

३६. (१) [१][राज्य] परिषदेने एक दंत आरोग्यरक्षक नोंदवही किंवा दंत कारागीर नोंदवही ठेवावी असा निदेश [१][राज्य] शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे देऊ शकेल.

(२) कलम ३५ चे उपबंध, जेथवर ते लागू करता येण्यासारखे असतील तेथवर, या कलमात उल्लेखिलेल्या नोंदवहीतील नोंदणी अर्जांच्या संबंधात लागू होतील.

दंत आरोग्यरक्षक म्हणून नोंदणी होण्यासाठी अर्हता.

३७. एखादी व्यक्ती [३][राज्यात] राहात असेल आणि दंत आरोग्यशास्त्रातील मान्यताप्राप्त अर्हता धारण करीत असेल तर, विहित फी दिल्यावर तिचे नाव दंत आरोग्यरक्षक नोंदवहीत नोंदले जाण्यास ती हक्कदार होईल :

परंतु, पहिल्या दंत आरोग्यरक्षक नोंदवहीच्या प्रयोजनांसाठी एखादी व्यक्ती, जर ती कलम ३६-पोटकलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी किमान दोन वर्षे एवढा काळ आपल्या चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून दंत आरोग्यरक्षकाचा व्यवसाय करीत असेल तर, नोंदणी होण्यास हक्कदार होईल.

दंत कारागीर म्हणून नोंदणी होण्यासाठी अर्हता.

३८. एखादी व्यक्ती कलम १२ मध्ये उल्लेखिलेल्या विहित आवश्यकता पूर्ण करीत असेल तर, विहित फी दिल्यावर दंत कारागीर नोंदवहीत तिचे नाव दाखल केले जाण्यास ती हक्कदार होईल :

परंतु, पहिली दंत कारागीर नोंदवही तयार करण्याच्या प्रयोजनांसाठी एखादी व्यक्ती, जर ती कलम ३६-पोटकलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी किमान दोन वर्षे एवढा काळ आपले चरितार्थाचे प्रमुख साधन म्हणून दंत कारागिराचा व्यवसाय करीत असेल तर, नोंदणी होण्यास हक्कदार होईल.

नवीकरण फी.

३९. (१) [१][राज्य] शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, नोंदवहीत प्रथमतः ज्या वर्षी नाव नोंदवण्यात आले त्या वर्षानंतर येणाऱ्या वर्षाच्या ३१ डिसेंबर नंतर नोंदवहीत नाव चालू ठेवण्यासाठी, प्रत्येक नोंदवहीच्या संबंधात विहित करण्यात येईल अशी नवीकरण फी [१][राज्य] परिषदेस दरवर्षी देण्यात यावी आणि असा निदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत अशी नवीकरण फी, ज्या वर्षाशी ती संबंधित असेल त्या वर्षाच्या १ एप्रिल पूर्वी देय होईल.

(२) नियत दिनांकापूर्वी नवीकरण फी देण्यात आली नसेल त्याबाबतीत, निबंधक, कसूरदाराचे नाव नोंदवहीतून काढून टाकील :

परंतु, अशाप्रकारे काढून टाकलेले नाव, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे पैसे भरल्यावर नोंदवहीत पूर्ववत् दाखल करता येईल.

[४][(३) नवीकरण फी देण्यात आल्यावर, निबंधक नवीकरण प्रमाणपत्र देईल आणि असे प्रमाणपत्र हा नोंदणीचे नवीकरण केल्याचा पुरावा असेल.]

अतिरिक्त अर्हतांची नोंद करणे.

४०. नोंदलेला दंतवैद्य, तो संपादन करील अशी आणखी कोणतीही मान्यताप्राप्त [५][दंतवैद्यकीय] अर्हता विहित फी दिल्यावर नोंदवहीत दाखल केली जाण्यास हक्कदार होईल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. मद्रास विधि अनुकूलन आदेश, १९५४ द्वारे समाविष्ट केले.

३. अनुकूलन आदेश १९५०, द्वारे "प्रांत" याऐवजी घातले.

४. १९७२ चा अधिनियम ४२–कलम २१ द्वारे पोटकलम (३) ऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

५. १९५५ चा अधिनियम १२–कलम ११ द्वारे घातले.

४१. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, जर-- नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

(एक) एखाद्या व्यक्तीचे नाव चुकीने किंवा अपवेदनामुळे किंवा महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती दडपून टाकल्यामुळे नोंदवहीत नोंदले गेले आहे, किंवा

(दोन) ती कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरली असल्याचे सिद्ध झाले आहे किंवा कोणतेही व्यावसायिक गर्हणीय वर्तन केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले आहे [1][किंवा कलम १७क खाली विहित केलेले व्यावसायिक वर्तनाचे व शिष्टाचाराचे मानदंड किंवा नीतिसंहिता यांचे तिने उल्लंघन केले आहे] व त्यामुळे [2][राज्य] परिषदेच्या मते नोंदवहीत तिचे नाव चालू राहण्यास ती अयोग्य ठरली आहे, [3][किंवा]

[3][(तीन) कलम ३४-पोटकलम (२)-खंड (ख्) खाली तिची तात्पुरती नोंदणी करण्यास परवानगी दिली असता, अशी नोंदणी झाल्यानंतर वैयक्तिक लाभासाठी ती दंतवैद्यकीचा व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले आहे,]

त्याबाबत, त्या व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि आणखी काही चौकशी करणे स्वतःला योग्य वाटल्यास ती केल्यानंतर [2][राज्य] परिषदेची खात्री पटली तर, अशा व्यक्तीचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात यावे असा ती आदेश देऊ शकेल.

(२) नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्यासाठी आदेश देण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखाली त्या [4][राज्यात] नोंदणी केली जाण्यास कायमची किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या वर्षांच्या कालावधीपर्यंत अपात्र होईल असे पोटकलम (१) खालील आदेशाद्वारे निदेशित करता येईल.

(३) पोटकलम (१) खालील आदेश, तो काढल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांची मुदत संपेपर्यंत परिणामक होणार नाही.

(४) पोटकलम (१) खालील आदेशामुळे नाराज झालेल्या व्यक्तीला, असा आदेश काढल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत [2][राज्य] शासनाकडे अपील करता येईल, आणि अशा अपीलान्ती [2][राज्य] शासनाने दिलेला आदेश अंतिम असेल.

(५) या कलमाखाली किंवा कलम ३९ च्या पोटकलम (२) खाली नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्यात आलेले आहे अशा व्यक्तीला आपले नोंदणी प्रमाणपत्र [5][आणि कोणतेही नवीकरण प्रमाणपत्र असल्यास ते] ताबडतोब निबंधकाच्या स्वाधीन करावे लागेल आणि अशाप्रकारे काढून टाकलेले नाव शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

[3][(६) या कलमाखाली किंवा कलम ३९ च्या पोटकलम (२) खाली जिचे नाव राज्य दंतवैद्य नोंदवहीतून काढून टाकण्यात आलेले आहे अशी व्यक्ती, जिच्या नोंदवहीतून तिचे नाव काढून टाकण्यात आले आहे अशा राज्य परिषदेच्या मान्यतेशिवाय अन्य कोणत्याही राज्य दंतवैद्य नोंदवहीत नाव नोंदवून घेण्यास हक्कदार होणार नाही.]

४२. [2][राज्य] परिषद, तिला पुरेशी वाटतील अशा कारणांवरून आणि [2][राज्य] शासनाच्या मान्यतेच्या अधीनतेने, कोणत्याही वेळी असा आदेश देऊ शकेल की, नोंदवहीतून काढून टाकण्यात आलेले एखाद्या व्यक्तीचे नाव, विहित फी देण्यात आल्यावर, तीमध्ये पूर्ववत् दाखल करण्यात यावे. नोंदवहीत नाव पूर्ववत् दाखल करणे.

४३. नोंदवहीत नाव दाखल करण्यास नकार देणारा किंवा नोंदवहीतून नाव काढून टाकणारा कोणताही आदेश कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद ठरवता येणार नाही. अधिकारितेला आडकाठी.

४४. नोंदणी प्रमाणपत्र [5][किंवा नवीकरण प्रमाणपत्र] हरवले किंवा नष्ट झाले आहे अशी निबंधकांची खात्री करून देण्यात आली तर, निबंधक विहित फी देण्यात आल्यावर, विहित नमुन्यात प्रमाणपत्राची दुसरी प्रत देऊ शकेल. प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.

---

१. १९७२ चा अधिनियम ४२ कलम--२२ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय' याऐवजी घातले.

३. १९५५ चा अधिनियम १२--कलम १२ द्वारे घातले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी घातले.

५. १९७२ चा अधिनियम ४२--कलम २३ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

नोंदवह्या छापणे.

४५. निबंधक प्रत्येक वर्षातील १ एप्रिल नंतर होईल तेवढ्या लवकर, उक्त दिनांकास नोंदवह्या ज्या स्वरूपात असतील त्याप्रमाणे त्यांच्या प्रती छापवून घेईल आणि अशा प्रती, त्या मिळण्याकरता अर्ज करणाऱ्या व्यक्तींनी विहित आकार दिल्यावर त्यांना उपलब्ध करून देण्यात येतील, आणि या प्रतींमध्ये ज्यांची नावे उक्त दिनांकास दाखल करण्यात आली आहेत अशा व्यक्ती ह्या नोंदलेले दंतवैद्य, नोंदलेले दंत आरोग्यरक्षक किंवा, प्रकरणपरत्वे, नोंदलेले दंत कारागीर होत्या याचा तो पुरावा असेल.

नोंदणीचा परिणाम.

४६. (१) दंतवैद्य म्हणून कायद्याने मान्यता मिळालेल्या व्यक्तीचा अन्य कोणत्याही कायद्यातील कोणताही निर्देश हा, या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेल्या दंतवैद्याचा निर्देश असल्याचे मानले जाईल.

(२) अन्य कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली आवश्यक केलेले दंतवैद्याचे प्रमाणपत्र, त्यावर सही करणारी व्यक्ती ही जर या अधिनियमाखाली दंतवैद्य म्हणून नोंदणी झालेली व्यक्ती नसेल तर, विधिग्राह्य होणार नाही.

(३) [1][कलम ३२–पोटकलम (२) खाली नियत करण्यात आलेल्या दिनांकापासून] [2][तीन वर्षे] संपल्यानंतर, ज्या व्यक्तीची [3][राज्य] दंतवैद्य नोंदवहीतील भाग 'क' मध्ये दंतवैद्य म्हणून नोंदणी झालेली नाही अशा व्यक्तीला ज्याचा खर्च संपूर्णतः किंवा अंशतः सार्वजनिक किंवा स्थानिक निधींतून चालवला जातो असा कोणताही [4]* * * दवाखाना, रुग्णालय किंवा अन्य संस्था यामध्ये [5][केंद्र शासन किंवा राज्य शासन] यांच्या मंजुरीविना, दंतवैद्य म्हणून कोणतेही पद धारण करता येणार नाही :

परंतु, या पोटकलमाचे उपबंध, [6][उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी] अशा प्रकारचे पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाहीत.

(४) एखाद्या [7][राज्यातील] दंत आरोग्यरक्षक नोंदवही प्रकाशित करण्यात आल्यापासून दोन वर्षे संपल्यानंतर, त्या नोंदवहीत जिचे नाव नोंदवण्यात आलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्याचा खर्च संपूर्णतः किंवा अंशतः सार्वजनिक किंवा स्थानिक निधींतून चालवला जातो असा त्या [7][राज्यातील] कोणताही दवाखाना, रुग्णालय किंवा अन्य संस्था यामध्ये दंत आरोग्यरक्षक म्हणून कोणतेही पद धारण करता येणार नाही.

(५) जी व्यक्ती एखाद्या [7][राज्यातील] नोंदलेला दंतवैद्य, नोंदलेला दंत आरोग्यरक्षक किंवा नोंदलेला दंत कारागीर आहे अशा कोणत्याही व्यक्तीस त्या नात्याने अन्य कोणत्याही [7][राज्यात] व्यवसाय करता येईल.

नोंदणी वर्ग करणे.

[8][**४६क.** एका राज्यात नोंदणी झालेला दंतवैद्य अन्य राज्यात व्यवसाय करीत असेल त्याबाबतीत, अशा अन्य राज्यातील नोंदणी–नवीकरणाच्या फीहून अधिक असणार नाही इतकी विहित फी भरून तो ज्या राज्यात त्याचे नाव नोंदण्यात आले आहे अशा राज्याच्या नोंदवहीतून काढून ते ज्या राज्यात तो दंतवैद्यकीचा व्यवसाय करीत आहे त्या राज्याच्या नोंदवहीत वर्ग केले जाण्यासाठी विहित नमुन्यात परिषदेकडे अर्ज करू शकेल आणि असा कोणताही अर्ज मिळाल्यावर, या अधिनियमात अन्यत्र काहीही अंतर्भूत असले तरी, परिषद अशा व्यक्तीचे नाव पूर्वोक्त नोंदवहीतून काढून टाकावे आणि उत्तरोक्त राज्याच्या नोंदवहीत नोंदण्यात यावे असा निदेश देईल आणि संबंधित राज्य परिषद अशा निदेशांचे पालन करील :

परंतु, अशा व्यक्तीस, पूर्वीच्या राज्यातील तिच्या नोंदणीसंबंधातील सर्व देणे रकमा तिने चुकत्या केल्या आहेत अशा आशयाचे एक प्रमाणपत्र सादर करण्यास फर्माविण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जिच्याविरुद्ध केलेली कोणतीही शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबित आहे अशा व्यक्तीने नोंदणी वर्ग केली जाण्यासाठी कोणताही अर्ज केला असेल त्याबाबतीत, किंवा ती वर्ग केली जाण्यासाठी केलेला अर्ज प्रामाणिकपणे केलेला नसल्याने तो वर्ग करण्यात येऊ नये असे अन्य कोणत्याही कारणावरून परिषदेस वाटेल त्याबाबतीत, परिषद याबाबतीत अभिवेदन करण्यासाठी दंतवैद्यास वाजवी संधी दिल्यानंतर, अर्ज फेटाळू शकेल.]

---

१. १९५५ चा अधिनियम १२–कलम १३ द्वारे "या अधिनियमाच्या प्रारंभापासून" याऐवजी घातले.

२. १९५० चा अधिनियम ५८–कलम ३ द्वारे भूतलक्षी प्रभावाने "दोन वर्षे" याऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय" या ऐवजी घातले.

४. १९५५ चा अधिनियम १२–कलम १३ द्वारे "राज्यात" हे शब्द गाळले.

५. कित्ता––कलम १३ द्वारे "राज्य शासन" या ऐवजी घातले.

६. कित्ता––कलम १३ द्वारे "या अधिनियमाच्या प्रारंभी" याऐवजी घातले.

७. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

८. १९७२ चा अधिनियम ४२–कलम २४ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण ५ वे

### संकीर्ण

४७. जिचे नाव त्या त्या वेळी नोंदवहीत नोंदण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीने जर, आपले नाव अशाप्रकारे नोंदण्यात आले आहे असे खोटे अभिवेदन केले किंवा आपले नाव अशाप्रकारे नोंदण्यात आले आहे हे वाजवीपणे सूचित होईल अशा बेताने आपले नाव किंवा अभिधान यांच्याजोडीला कोणतेही शब्द किंवा अक्षरे वापरली तर, ती पहिल्या दोषसिद्धीअंती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, आणि तदनंतरच्या कोणत्याही दोषसिद्धीअन्ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांहून अधिक नाही इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. नोंदणी झाली नसल्याचा खोटा दावा करण्याबद्दल दंड.

४८. जर कोणतीही व्यक्ती,— उपाधींचा गैरवापर.

(क) दंतवैद्य नोंदवहीत नोंदणी करण्यात आलेली अशी ती व्यक्ती नसताना, दंतवैद्यक व्यवसायी, दंतशल्यविशारद, शल्यविशारद दंतवैद्य किंवा दंतवैद्य अशा वर्णनाची उपाधी धारण करील किंवा तिचा वापर करील तर किंवा

(ख) दंत आरोग्यरक्षक नोंदवहीत नाव नमूद केलेली अशी ती व्यक्ती नसताना, अशी नोंदवही जेथे प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या [1][राज्यात] दंत आरोग्यरक्षक म्हणून उपाधी धारण करील किंवा तिचा वापर करील तर, किंवा

(ग) दंत कारागीर नोंदवहीत नाव नमूद केलेली अशी ती व्यक्ती नसताना, अशी नोंदवही जेथे प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या [1][राज्यात] दंत कारागीर म्हणून उपाधी धारण करील किंवा तिचा वापर करील तर, [2][किंवा]

[2][(घ) मान्यताप्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण करीत नसताना, दंतवैद्यकीय अर्हता सूचित करणारी किंवा अभिप्रेत असलेली पदवी किंवा पदविका किंवा संक्षेपाक्षर वापरील तर],

ती, पहिल्या दोषसिद्धीअन्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, आणि तदनंतरच्या कोणत्याही दोषसिद्धीअन्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांहून अधिक नाही इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

४९. (१) दंतवैद्यांच्या बाबतीत [3][कलम ३२-पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकापासून] आणि दंत आरोग्यरक्षक किंवा दंत कारागीर यांच्याबाबतीत, जेथे कलम ३६ खाली दंत आरोग्यरक्षक किंवा दंत कारागीर यांची नोंदवही तयार करण्यात आली असेल अशा [4][राज्यांमध्ये] [5][राज्य] शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून [6][तीन वर्षे] संपल्यानंतर, नोंदलेला दंतवैद्य, नोंदलेला दंत आरोग्यरक्षक किंवा नोंदलेला दंत कारागीर याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला दंतवैद्यकीचा, अथवा दातांवरील किटण काढून टाकण्याच्या, ते स्वच्छ करण्याच्या किंवा त्यांना पॉलिश करण्याच्या अगर, प्रकरणपरत्वे, कवळ्या किंवा दंतचिकित्सेची उपयंत्रे तयार करण्याच्या किंवा दुरुस्त करण्याच्या कारागिरीचा व्यवसाय करता येणार नाही, किंवा तशा प्रकारे व्यवसाय करण्यास आपण तयार असल्याचे कोणत्याही रीतीने सूचित करता येणार नाही : नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी व्यवसाय करणे.

परंतु, या कलमाचे उपबंध पुढील गोष्टींस लागू होणार नाहीत:—

(क) नोंदलेल्या वैद्यकीय व्यवसायीने दंतवैद्यकीचा व्यवसाय करणे ;

